RNI No. - MAHMAR 2023/84526

# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com

❑ वर्ष - २ रे ❑ अंक -९ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ बुधवार दि.२४ जानेवारी २०२४ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६

# तृणमूल काँग्रेस एकट्याने लोकसभा लढणार, ममता बॅनर्जींची घोषणा

## काँग्रेसने १२ जागांवर लढण्याची मागणी केली होती; यावरून आघाडी फिस्कटली

**दि.२४विदर्भ प्रजासत्ताक नवी दिल्ली**

भाजपाविरोधात एकत्र आलेल्या विरोधकांच्या इंडिया आघाडीला मोठा झटका बसला आहे. पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी एकला चलो रे ची भूमिका जाहीर केली आहे. लोकसभा निवडणूक राज्यात एकट्याने लढणार असल्याचे ममता यांनी जाहीर केले आहे. आपण दिलेला जागा वाटपाचा प्रस्ताव काँग्रेसने मान्य न केल्याने हा निर्णय घेतल्याचे ममता यांनी म्हटले आहे.

विरोधकांची मोट बांधून मोदींना टक्कर देण्याची योजना नितीश कुमार, शरद पवार, ममता बॅनर्जी आदी नेत्यांनी आखली होती. परंतु गेल्या काही दिवसांपासून नितीशकुमारांचेच तळ्यात मळ्यात सुरु झाले आहे. तर काँग्रेसला मित्रपक्षांच्याही जागा हव्या आहेत. यामुळे सारा पेच फसला असून लोकसभा निवडणुकीची घोषणा काही दिवसांवर आलेली असली तरी जागा वाटपाचा तिढा सुटत नसल्याने आता प्रादेशिक पक्षांनी आपापली वेगळी वाट धरण्याचा विचार सुरु केला आहे.

यात ममता यांनी आघाडी घेतली असून तृणमुल काँग्रेस पश्चिम बंगालमध्ये एकट्याच्या ताकदीवर लढणार असल्याचे



ममता यांनी म्हटले आहे. ममता यांनी काँग्रेसला दोन जागा सोडण्याची तयारी दर्शविली होती, तर काँग्रेसने १२ जागांवर लढण्याची मागणी केली होती. यावरून आघाडी फिस्कटली आहे. काही दिवसांपूर्वी उत्तर प्रदेशमध्ये मायावतींनी बसपा एकट्याने लढणार असल्याचे जाहीर केले होते. यावेळी त्यांनी सपावर गंभीर आरोप केले होते.

माझी काँग्रेस पक्षाशी कोणतीही चर्चा झाली नाही. बंगालमध्ये आम्ही एकटेच लढू, असे मी नेहमीच म्हटले आहे. देशात काय होईल याची मला चिंता नाही, पण आम्ही एक धर्मनिरपेक्ष पक्ष आहोत आणि बंगालमध्ये , आम्ही एकटेच भाजपचा पराभव करू. मी इंडिया आघाडीचा एक भाग आहे. राहुल गांधींची न्याय यात्रा आमच्या राज्यातून जात आहे पण आम्हाला त्याची माहिती देण्यात आलेली नाही, असे ममता यांनी म्हटले आहे. काँग्रेसने ३०० जागांवर निवडणूक लढवावी आणि प्रादेशिक पक्षांना त्यांच्या भागात भाजपशी स्पर्धा करू द्यावी, असे आम्ही आधीच सांगितले होते, असे ममता बॅनर्जी यांनी स्पष्ट केले. जेणेकरून प्रादेशिक पक्ष एकत्र राहतील, पण त्यांनी हस्तक्षेप केल्यास आघाडीचा पुन्हा विचार करावा लागेल, असेही ममता म्हणाल्या.पश्चिम बंगालमध्ये काँग्रेसने तृणमूल काँग्रेसकडे १० ते १२ जागांची मागणी केली होती. पण, तृणमूलने काँग्रेसला फक्त २ जागा दिल्या होता. यानंतर पश्चिम बंगाल काँग्रेसचे अध्यक्ष अधीर रंजन चौधरी यांनी ममता बॅनर्जींवर टीका केली होती. ममता बॅनर्जींच्या दयेवर निवडणुका लढवल्या जाणार नाहीत. ममता बॅनर्जी ज्या दोन जागा सोडण्यास तयार आहे, तिथे काँग्रेसने भाजपा आणि तृणमूलचा पराभव केला आहे. निवडणूक कशी लढवायची, हे काँग्रेसला माहिती आहे, असा हल्लाबोल अधीर रंजन चौधरींनी ममता बॅनर्जींवर केला होता.

# रोहित पवार ईडीसमोर हजर

## हा काळ आमच्यासाठी संघर्षाचा : सुप्रिया सुळे




**दि.२४विदर्भ प्रजासत्ताक मुंबई**

शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार यांच्या बारामती ॲग्रोवर दोन आठवड्यांपूर्वी ईडीनं मोठी कारवाई केली. आता त्यापाठोपाठ रोहित पवारांना ईडीनं समन्स बजावल्यानंतर ते स्वत: ईडीसमोर चौकशीसाठी हजर झाले आहेत. रोहित पवार यांची एकीकडे ईडीकडून चौकशी चालू असताना दुसरीकडे सुप्रिया सुळेंनी या मुद्द्यावर आपली स्पष्ट भूमिका मांडली आहे. रोहित पवार बुधवारी सकाळी चौकशीसाठी ईडीच्या कार्यालयात जात असताना सुप्रिया सुळेंनी त्यांना राज्यघटना भेट म्हणून दिली. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी घोषणाबाजीही केली. यानंतर माध्यमांशी बोलताना सुप्रिया सुळेंनी प्रतिक्रिया दिली.

सध्याचा काळ शरद पवार गटासाठी आणि एकूणच विरोधकांसाठी संघर्षाचा असल्याची भूमिका सुप्रिया सुळेंनी मांडली आहे. सत्याचा विजय होईलच. हा काळ आमच्यासाठी संघर्षाचा आहे. आव्हानं येत राहतील. आम्ही आव्हानांवर मात करून संघर्ष करू. पण सत्याच्याच मार्गाने चालू हा यशवंतराव चव्हाणांचा वारसा पुढे नेण्याचं काम शरद पवारांनी गेली ६ दशकं केलं आहे. त्याच महाराष्ट्राच्या स्वाभिमानासाठी आमची ही लढाई आहे, असं सुप्रिया सुळे यावेळी म्हणाल्या.रोहित पवार ईडीच्या कार्यालयात दाखल होत असताना राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी तिथे जमून शक्तिप्रदर्शन केल्याचं बोललं जात आहे. हा दावा सुप्रिया सुळेंनी फेटाळून लावला. आम्ही इथे जमणं हे शक्तीप्रदर्शन नाही. काही बाबतीत प्रेमही असतं, नातीही असतात. जर कार्यकर्त्यांना वाटत असेल की आपला भाऊ खंबीरपणे लढतोय तर त्याच्यासाठी आपण यावं. तर त्यात गैर काय? आम्ही या संघर्षाच्या काळाचा ताकदीने, सत्याच्या मार्गाने सामना करू, असा निर्धार सुप्रिया सुळेंनी व्यक्त केला.

# राहुल गांधींच्या सुरक्षेला धोका; भारत जोडो न्याय यात्रेबाबत खरगेंचं अमित शाह यांना पत्र

**दि.२४विदर्भ प्रजासत्ताक नवी दिल्ली**



राहुल गांधी यांच्या भारत जोडो यात्रेदरम्यान आसाममध्ये झालेल्या घटनेबाबत काँग्रेसने राज्याचे मुख्यमंत्री हिमंता बिस्व सरमा यांच्या सरकारवर जोरदार हल्लाबोल सुरूच ठेवला आहे. य़ाच दरम्यान आता काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांना याबाबत पत्र लिहिलं आहे. राहुल गांधींची सुरक्षा पुन्हा पुन्हा धोक्यात असल्याचं खरगे यांनी म्हटलं आहे. याबाबत त्यांनी आसाम पोलिसांवर आरोपही केले आहेत.

काँग्रेस अध्यक्षांनी आपल्या पत्रात म्हटलं आहे की, मणिपूर ते मुंबई अशी १४ जानेवारीला सुरू झालेली भारत जोडो यात्रा आसाममध्ये पोहोचल्यानंतर असे काही प्रसंग आले की आसाम पोलिसांना राहुल गांधी यांच्या संरक्षण करण्यासाठी पुढे यायचं होतं, पण तसं झालं नाही. अरुणाचल प्रदेशातून काँग्रेसची यात्रा आसामच्या सोनितपूर जिल्ह्यात परतली तेव्हा तेथील स्थानिक अधीक्षक, जे सीएम सरमा यांचे बंधूही आहेत, त्यांनी काँग्रेसच्या यात्रेवर भाजपा कार्यकर्त्यांनी केलेला हल्ला प्रेक्षक म्हणून पाहिला, असा आरोप खरगे यांनी केला.

मल्लिकार्जुन खरगे असेही म्हणाले की, भाजपा कार्यकर्त्यांनी काँग्रेस सोशल मीडिया टीम आणि पक्षाचे सरचिटणीस जयराम रमेश यांच्याशी झटापट केली आणि त्यांच्या गाडीवरही हल्ला केला. या लोकांनी भारत जोडो न्याय यात्रेच्या विरोधात घोषणाबाजी केली आणि वाहनांवरील यात्रेचे पोस्टरही फाडले.

२२ जानेवारी रोजी भाजपा कार्यकर्त्यांनी राहुल गांधींचा ताफा नागाव जिल्ह्यात अडवला, ज्यामुळे त्यांच्या सुरक्षेसाठी अत्यंत धोकादायक परिस्थिती निर्माण झाली. या सर्व धक्कादायक घटनांदरम्यान, जेव्हा-जेव्हा भाजपाचे कार्यकर्ते राहुल गांधींच्या जवळ येतात तेव्हा आसाम पोलीस प्रेक्षक म्हणून पाहत राहिले, त्यामुळे काही लोक राहुल गांधींची सुरक्षा तोडण्याचा प्रयत्न करत राहिले.

अमित शाह यांनी या प्रकरणात हस्तक्षेप करून यात्रा नियोजित प्रमाणे पार पाडावी, अशी मागणी खरगे यांनी केली. राहुल गांधी किंवा भारत जोडो न्याय यात्रेत सहभागी होणारा काँग्रेसचा कोणताही कार्यकर्ता जखमी झाल्यामुळे यात्रेत कोणताही अनुचित प्रकार घडू नये, यासाठी केंद्रीय गृहमंत्र्यांचा हस्तक्षेप आवश्यक आहे, असे ते म्हणाले आहेत.

# दहावी, बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी महत्त्वाची बातमी

## बोर्डाच्या परीक्षेत विद्यार्थ्यांना मिळणार १० मिनिटांचा जास्त वेळ

**दि.२४विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

दहावी आणि बारावी बोर्ड परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी महत्त्वाची बातमी समोर आली आहे. मागील वर्षी प्रमाणे यावर्षी सुद्धा दहावी बारावी बोर्ड परीक्षेमध्ये परीक्षेच्या निर्धारित वेळेनंतर दहा मिनिटे वाढवून दिली जाणार आहे. उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ. १२ वी) व माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ. १० वी) परीक्षा देणाऱ्या परीक्षार्थ्यांना प्रश्नपत्रिका वाचण्यासाठी (आकलन होण्यासाठी) परीक्षा दालनात प्रश्नपत्रिकांचे वाटप परीक्षेच्या निर्धारीत वेळेपूर्वी दहा मिनिटे अगोदर करण्यात येत होते.



दहावी आणि बारावीच्या परीक्षा विद्यार्थ्यांच्या जीवनातील एक महत्वपूर्ण टप्पा असल्यामुळे पालक व समाज घटक यांचे या परीक्षांकडे बारकाईने लक्ष असते. परंतु प्रश्नपत्रिका मोबाईलवर तसेच अन्य समाज माध्यमातून व्हायरल झाल्याच्या अफवा व काही अंशी अशा घटना निदर्शनास आलेल्या आहेत. अशा प्रकारच्या घटनांना प्रतिबंध व्हावा तसेच परीक्षा निकोप, भयमुक्त व कॉपीमुक्त वातावरणात सुरळीत पार पडाव्यात यासाठी परीक्षेच्या निर्धारीत वेळेपूर्वी दहा मिनिटे अगोदर प्रश्नपत्रिका वितरीत करण्याची सुविधा फेब्रुवारी-मार्च २०२३ परीक्षेपासून रद्द करण्यात आलेली होती. विद्यार्थ्यांचे हित लक्षात घेत पालक, विद्यार्थ्यांच्या मागणीचा विचार करून दहा मिनिटे परीक्षेच्या निर्धारित वेळेनंतर दिली जाणार आहेत. गेल्या वर्षी देखील वेळ वाढवून देण्यात येत आहे.

**सकाळ सत्रात स. १०.३० वाजता परीक्षा केंद्रावर उपस्थित राहणे आवश्यक**

फेब्रुवारी-मार्च २०२४ परीक्षांचा वेळी ही सकाळ सत्रात सकाळी ११.०० वाजता तसेच दुपार सत्रात दु.३.०० वाजता परीक्षा दालनात प्रश्नपत्रिकाचे वितरण करण्यात येईल व लेखनास प्रारंभ होईल. सकाळ सत्रात स. १०.३० वाजता तसेच दुपार सत्रात दु. २.३० वाजता परीक्षार्थ्यांने परीक्षा केंद्रावर उपस्थित राहणे आवश्यक आहे

बारावीची लेखी परीक्षा २१ फेब्रुवारी २०२४ ते २३ मार्च २०२४ या कालावधीत होणार आहे. तर, दहावीची लेखी परीक्षा १ मार्च २०२४ ते २६ मार्च २०२४ या कालवधीत होणार आहे. फेब्रुवारी-मार्च २०२४ मध्ये महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर व कोकण या नऊ विभागीय मंडळामार्फत घेण्यात येणार आहे.

# ५ फेब्रुवारीला महाराष्ट्राचे संपूर्ण मंत्रिमंडळ जाणार रामलल्लाच्या दर्शनाला

**दि. विदर्भ प्रजासत्ताक मुंबई**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अयोध्येत राम मंदिराचं लोकार्पण केलं. मंदिरात प्रभू रामाची प्राणप्रतिष्ठाही केली. या सोहळ्याला जगभरातील महत्त्वाच्या व्यक्ती उपस्थित होत्या. या सोहळ्या निमित्ताने पंतप्रधानांनी देशवासियांना संबोधित केलं. आपले प्रभू राम परत आलेत असं त्यांनी सांगितलं. त्यानंतर दुसऱ्या दिवसापासून ते आजपर्यंत राम मंदिरात दर्शनासाठी तुफान गर्दी उसळली आहे. देशभरातून भाविक रामलल्लाचं दर्शन घेण्यासाठी येत आहेत. तर, दुसरीकडे भाजपने प्रभू रामाच्या दर्शनासाठी मेगा प्लान तयार केला आहे. भाजपशासित राज्यातील मुख्यमंत्र्यांचा हा मेगा प्लान तयार करण्यात आला आहे.

अयोध्येत राम मंदिरात रामाच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठापना झाल्यानंतर भाजपने आता अयोध्यावारीचा टाइम टेबल तयार केला आहे. भाजपशासित प्रत्येक राज्याचे मुख्यमंत्री हे त्यांच्या मंत्रिमंडळासह अयोध्येत दर्शनाला येणार आहेत. त्यासाठी भाजपने प्रत्येक राज्यांच्या मुख्यमंत्र्यांना दर्शनाची वेळही दिली आहे. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना दर्शनासाठी ५ फेब्रुवारीची वेळ देण्यात आली आहे. त्यामुळे शिंदे आणि त्यांचं मंत्रिमंडळ ५ फेब्रुवारी रोजी अयोध्येत जाऊन रामलल्लाचं दर्शन घेतानाच शरयू किनारी महाआरतीही करणार असल्याचं सांगितलं जात आहे.

# मनोज जरांगेंच्या मुंबईतील आंदोलनाविरोधात सदावर्तेंची याचिका; हायकोर्टात होणार सुनावणी

**दि.२४विदर्भ प्रजासत्ताक मुंबई**

मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी मनोज जरांगे पाटील यांच्या नेतृत्वात आंदोलन होणार आहे. यासाठी २६ जानेवारी पर्यंत राज्यभरातून मोठ्या संख्येने मराठा समाजाचे बांधव मुंबईत येत आहे. मनोज जरांगे पाटील आज पुण्यात पोहोचले आहेत.तर दुसरीकडे, मुंबई हायकोर्टात वकील गुणरत्न सदावर्ते यांनी मराठा आंदोलनाविरोधात याचिका दाखल केली असून आज या याचिकेवर सुनावणी होणार आहे. मराठा आंदोलनाविरोधातील याचिकेवर आज सुनावमी होणार आहे. मनोज जरांगे यांच्या आंदोलनाला परवानगी



नाकारावी अशी मागणी या याचिकेत केली आहे. सध्या मनोज जरांगे पाटील लाखो मराठा आंदोलकांसह पुण्यात पोहोचले असून ते पुण्यातून पनवेल असा प्रवास करत मुंबईत पोहोचणार आहेत. या सुनावणीत हायकोर्ट काय निर्देश देतं हे पाहणे महत्वाच ठरणार आहे.

**आपल्याला कोणाला वेठीस धरण्याचा अधिकार नाही- सदावर्ते**

संविधानीक अधिकारात शांततेत काही करण्याचा अधिकार आहे. शांतता उद्ध्वस्त करण्याचा अधिकार नाही, मनोज जरांगेंची पार्श्वभूमी गुन्हेगारीची आहे, असा आरोपही सदावर्ते यांनी केला. आम्ही न्यायालया या सर्व गोष्टी सांगितल्या आहे. ही केस आता न्यायालयासमोर आली आहे, आज पुण्यात मोठी रांग आहे. यामुळे लोकांचे जनजीवन विस्कळीत झाले आहे. मुंबईत एवढे मोठे आले तर कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ शकतो, असंही सदावर्ते म्हणाले.

# पंतप्रधान मोदी शिवरायांच्या गुणांचे अनुसरण करतात हे सांगायला संकोच वाटला नाही: गोविंददेव गिरी

**दि.२४विदर्भ प्रजासत्ताक अयोध्या**

अयोध्येत राम मंदिर लोकार्पण झाल्यानंतर पहिल्याच दिवशी ५ लाख भाविकांनी रामललाचे दर्शन घेतले. राम मंदिरावरून अद्यापही आरोप-प्रत्यारोप होताना दिसत आहे. रामलला प्राणप्रतिष्ठा सोहळ्याच्या दिवशी श्रीराम जन्मभूमी तीर्थक्षेत्र ट्रस्टचे कोषाध्यक्ष स्वामी गोविंददेव गिरी महाराज यांनी छत्रपती शिवाजी महाराजांचे स्मरण करत पंतप्रधान मोदी यांचे कौतुक केले. मात्र, यावरून टीका झाली. या टीकेला गोविंददेव गिरी महाराज यांनी उत्तर दिले आहे.

गोविंददेव गिरी महाराज यांनी छत्रपती शिवाजी महाराज आणि पंतप्रधान मोदी यांची तुलना केली, असा दावा करत महाविकास आघाडीतील अनेक नेत्यांनी टीकास्त्र सोडले होते. यावर गोविंददेव गिरी महाराजांनी स्पष्ट शब्दांत उत्तर दिले आहे. एखाद्या चुकीच्या गोष्टीवर आपण टीका करतो. त्याप्रमाणे सद्गुणांचा गौरव करण्यात कुठलाही संकोच वाटत नाही. ज्यांची मने कोती असतात, मनात राजकारण भरलेले असते, त्यांच्या तोंडी अशा प्रकारच्या गोष्टी येतात, या शब्दांत गोविंददेव गिरी महाराजांनी पलटवार केला.

माझ्या आयुष्यात छत्रपती शिवाजी महाराज यांची तुलना कुणाशीही करणार नाही. प्रभू श्रीराम आणि श्रीकृष्णानंतर छत्रपती शिवाजी महाराज मला सर्वश्रेष्ठ वाटतात. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या गुणांचे अनुसरण काहीजण करतात. त्यात पंतप्रधान नरेंद्र मोदी हेदेखील आहेत. हे सांगण्यात मला कुठलाही संकोच वाटला नाही. कारण, छत्रपती शिवाजी महाराजांनी त्यांच्या जीवनात केलेल्या गुणांचे अनुसरण पंतप्रधान आपल्या जीवनात करताना दिसत आहे, असे गोविंददेव गिरी महाराज यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले.

## संपादकीय ......

# खासगी क्लासेसला लगाम

खासगी कोचिंग क्लासेसचे वाढते प्रस्थ आणि त्यामुळे विद्यार्थीवर्गाचे महाविद्यालयांकडे होणार्या दुर्लक्षाला लगाम लावण्यासाठी केंद्र सरकारने पुढाकार घेतला आहे. केंद्र सरकारकडून क्लासेससाठी नव्या मार्गदर्शक सूचना जारी करण्यात आल्या आहेत. त्यानुसार १६ वर्षांखालील विद्यार्थ्यांना कोचिंग क्लासेसमध्ये प्रवेश देता येणार नाही. म्हणजेच दहावीपर्यंत आता मुलांना क्लास लावता येणार नाही. तसेच रँक, गुणांच्या बाबतीत कोणत्याही प्रकारे गॅरंटी देणे कोचिंग क्लासेसना महागात पडणार आहे. कुणालाही खासगी कोचिंग सेंटर उघडता येणार नाही. त्यासाठी सर्वात आधी नोंदणी करावी लागेल. त्याशिवाय क्लास चालकांना विद्यार्थ्यांकडून अव्वाच्या सव्वा फी वसूल करता येणार नाही.

क्लासेसच्या माध्यमातून असंख्य डी.एड्., बी. एड्., एम. एड्., सेट–नेट पदवीधारकांना रोजगाराची संधी उपलब्ध होत असतानाही सरकार या निर्णयापर्यंत का पोहचले? असा प्रश्न यानिमित्ताने उपस्थित होत आहे. खरेतर खासगी क्लासेसचा परिणाम महाविद्यालयांतील शिक्षणावर होत आहे. विविध महाविद्यालये आणि खासगी क्लासेस यांच्यातील बेकायदेशीर करारांचे प्रमाण वाढले आहे. त्यामुळे शिक्षण व्यवस्थेवर आपसूक खासगी क्लासेसचालकांचे नियंत्रण येऊ पाहत आहे. महाविद्यालयांमध्ये शुल्क भरूनही खासगी क्लासेसचे गल्ले भरण्याचे धोरण काही महाविद्यालयांचे असल्याने त्यामुळे पालकांना मोठाच आर्थिक फटका बसतो.

दर्जेदार शिक्षण आणि नावलौकिक असलेल्या शैक्षणिक संस्थांमध्येही हा प्रकार वाढल्याचे निदर्शनास येत आहे. शिक्षण खासगी क्लासेसमध्ये आणि फक्त परीक्षा देण्यासाठी महाविद्यालयांचा वापर हे समीकरण आता वाढत आहे. याबद्दल खुलेपणाने बोलण्यासही शिक्षक धजावत नाहीत. वैद्यकीय आणि अभियांत्रिकी प्रवेश परीक्षेच्या तयारीसाठी विद्यार्थी खासगी शिकवण्या लावतात. त्यासाठी जास्त वेळ मिळावा म्हणून वर्गातील प्रत्यक्ष उपस्थितीत सूट देणार्या आणि क्लासचालकांच्या मर्जीतील कनिष्ठ महाविद्यालयात विद्यार्थी प्रवेश घेतात. फक्त प्रात्यक्षिकांसाठी महाविद्यालयात उपस्थिती लावतात. इतर वेळ खासगी क्लासेसला विद्यार्थी जातात. काही महाविद्यालयांनी तर थेट खासगी क्लासेससोबत अवैध करार केले असून पालकांचीही याला मूक संमती दिसते.

काही महिन्यांपूर्वी अभियांत्रिकी प्रवेशाची चौथी फेरी होऊन गेली तरी काही महाविद्यालयांमध्ये निम्म्याहून अधिक जागा शिल्लक राहिल्या. विद्यार्थ्यांनी आपल्या महाविद्यालयात प्रवेश घ्यावा म्हणून संबंधित महाविद्यालयांच्या प्राध्यापकांसह कर्मचार्यांनी विविध संस्थांचे उंबरे झिजविले, मात्र विद्यार्थी क्लासचालकांच्या मर्जीनुसारच प्रवेश घेत असल्याचे पुढे आले. वर्गातील उपस्थितीची सवलत जे महाविद्यालय देणार नाही, त्या महाविद्यालयांच्या विद्यार्थ्यांना प्रवेश द्यायचा नाही, असा नियमही काही क्लासेसचा आहे. त्यामुळे नियमानुसार चालणार्या महाविद्यालयांची नाहक फरपट होते. खरेतर आजकाल फक्त स्पर्धा परीक्षेसाठी विद्यार्थी तयारी करतात. क्लासेस संस्कृतीमुळे पालकांचे आर्थिक शोषण तर होतेच, त्याचबरोबर पुस्तकाव्यतिरिक्तच मूल्यशिक्षणापासून विद्यार्थी वंचित राहत आहेत.जर एखाद्या विद्यार्थ्याने पूर्ण पैसे भरूनही कोर्स अर्धवट सोडण्यासाठी अर्ज केला, तर कोर्सच्या उर्वरित कालावधीचे पैसे परत करावे लागतील. हॉस्टेल आणि मेस फीदेखील परताव्यात समाविष्ट केली जाईल. १० दिवसांमध्ये विद्यार्थ्यांना रक्कम माघारी करावी लागेल. शाळा, कॉलेज अथवा एखाद्या संस्थांमध्ये शिकणार्या विद्यार्थ्यांच्या वेळेत कोणत्याही परिस्थितीत कोचिंग क्लासेस घेण्यात येणार नाहीत. त्याशिवाय एका दिवसात पाच तासांपेक्षा जास्त क्लास चालणार नाही. सकाळी लवकर आणि रात्री उशिरा क्लासेस घेता येणार नाहीत. विद्यार्थी आणि शिक्षकांना साप्ताहिक सुट्टी द्यावी लागेल. हे नियम आज क्लासचालकांना जिकिरीचे वाटत असले तरी विद्यार्थ्यांच्या हितासाठी ते गरजेचेच आहेत.

# बसचालकांना मिळणार नाईट व्हिजन चष्मा

## ४० चालकांचा सत्कार : आरोग्याचे धडे अन् सेफ्टी किटही मिळणार

**दि.२४ विदर्भ प्रजासत्ताक नागपूर:** राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या (एसटी) वतीने बुधवारी, २४ जानेवारीला 'चालक दिवस' साजरा केला जाणार आहे. या दिवशी अपघातमुक्त सेवा देणाऱ्या तसेच डिझेलची बचत करणाऱ्या ४० बस चालकांचा सत्कारही केला जाणार आहे. याशिवाय ठिकठिकाणच्या बस आगारातही असेच कार्यक्रम पार पडणार आहेत.

असोसिएशन ऑफ स्टेट रोड ट्रान्स्पोर्ट अंडरटेकिंगने (एएसआरटीयू) २४ जानेवारी हा दिवस चालक दिन म्हणून साजरा करण्याचे निर्देश देशातील सर्व परिवहन उपक्रमांना दिले आहेत.



या अनुषंगाने एसटी महामंडळाच्या वतीने राज्यातील सर्व आगारांमध्ये विविध कार्यक्रम घेण्यात येणार असून बस चालकांचा सत्कार केला जाणार आहे.

१५ ते २० वर्षांत कोणताही अपघात न करता प्रवाशांची ने–आण करणाऱ्या अर्थात प्रवाशांना अपघातमुक्त सेवा देणाऱ्या प्रत्येक आगारातील पाच चालकांना सन्मानित करण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे महामंडळाच्या बसची, इंजिनची स्थिती चांगली नसतानादेखील कमी डिझेलमध्ये जास्त किलोमीटर बस चालविणाऱ्या पाच बस चालकांचाही सत्कार केला जाणार आहे. याच कार्यक्रमात आरटीओ आणि खासगी रुग्णसेवा देणाऱ्यांकडून सुरक्षित बस कशी चालवावी, आरोग्याची कशी काळजी घ्यावी, त्यासंबंधाने धडे (पीपीटी) दिले जाणार आहे. या कार्यक्रमात बसचालकांना सेफ्टी किट आणि रात्रीच्या वेळी बस चालविताना डोळ्यांवर ताण येऊ नये म्हणून नाईट व्हिजन गॉगलचे वितरण केले जाणार आहे.

### बसस्थानक, परिसर सजणार

नागपूरच्या गणेशपेठ बसस्थानकावर शहरातील चारही आगारांचा कार्यक्रम बुधवारी सकाळी १० वाजता पार पडणार आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी एसटीचे उपमहाव्यवस्थापक श्रीकांत गभणे, तर प्रमुख पाहुणे म्हणून पोलिस, आरटीओ आणि विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित राहणार असल्याची माहिती गणेशपेठ आगार व्यवस्थापक गौतम शेंडे यांनी आज पत्रकारांना दिली. बसस्थानक हार–फुलांनी, पताका आणि फलकांनी सजविले जाणार आहे.

**दि.२३विदर्भ प्रजासत्ताक** आनंदी आयुष्य जगण्यासाठी पैसा, प्रेम, यश यासोबतच आरोग्य उत्तम असणं देखील गरजेचं आहे. बदलती जीवनशैली, खाण्या–पिण्याच्या चुकीच्या सवयी आणि खूपवेळ एका जागी बसून काम करण्याची पद्धत यामुळे आरोग्यावर चुकीचा परिणाम होतो. आपल्या आरोग्यावर होणाऱ्या दुष्परिणांमाचा सामना करायचा नसेल तर आजपासूनच हे उपाय जरूर करा. रोजच्या सवयीत हे बदल केल्यास तुम्ही नेहमी हेल्दी राहाल.




सुदृढ आयुष्य जगण्यासाठी फॉलो करा

**सकाळी लवकर उठा**– सकाळी लवकर उठल्याने तुम्ही दिवसभर फ्रेश राहता. सकाळच्या वेळी असणाऱ्या हवेतील ऑक्सिजन आरोग्यास लाभदायक असतो. तसेच लवकर उठून कोवळ्या उन्हात फिरल्यास हाडांच्या समस्या उद्भवणार नाही.

**योगासाधना करणं आवश्यक**– सकाळी उठल्यानंतर काही वेळ व्यायाम, योगा करणे आवश्यक आहे. शरिर उत्तम राहण्यासाठी कमीत कमी ३० मिनिटे व्यायम करा.

**पचनक्रिया उत्तम ठेवा**– जर तुम्हाला उत्तम निरोगी आयुष्य हवे असेल तर तुमची पचनक्रिया सुदृढ असणे आवश्यक असते. जेवण झाल्यानंतर लगेच झोपणे टाळा. जेवल्यानंतर काही वेळ चालल्यास अन्न पचणास मदत होईल.

**खाण्याच्या पिण्याच्या सवयींवर लक्ष**– गरजेपेक्षा अधिक खाणं हे आरोग्यासाठी चांगले नसते. त्यामुळे शारिरीक हालचालींसाठी आपले डाएट योग्य असणे आवश्यक असते. अशावेळी कमी आणि हलके अन्न खा. योग्यरित्या पचलेले अन्न तुमचे आरोग्य उत्तम राखण्यास मदत करेल. यामुळे अतिरिक्त फॅट वाढण्यावर नियंत्रण मिळेल.

# भटक्या व विमुक्त जमातीच्या मतदार नोंदणीच्या विशेष शिबिरांमध्ये ५५४ जणांची मतदार नोंदणी

## नवमतदारांचा टक्का वाढला– जिल्हाधिकारी सौरभ कटियार

**दि.२४विदर्भ प्रजासत्ताक अमरावती,** – यंदा जिल्ह्यात लोकसभा आणि विधानसभा या दोन महत्त्वाच्या निवडणुका घेण्यात येणार आहेत. या पार्श्वभूमीवर राज्यात मतदार याद्यांच्या अद्ययावती करणासाठी विशेष संक्षिप्त पुनरीक्षण कार्यक्रम तसेच घरोघरी सर्वेक्षणाची मोहिम राबविण्यात आली होती. या विशेष संक्षिप्त पुनरीक्षण कार्यक्रमात राबविण्यात आलेल्या मोहिमांमुळे अंतिम मतदार यादीत नवमतदारांचा टक्का लक्षणीय वाढला, अशी माहिती जिल्हा निवडणुक अधिकारी तथा जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांनी आज येथे दिली.

अंतिम मतदार यादीच्या प्रकाशनानिमित्ताने जिल्हाधिकारी यांच्या दालनामध्ये आज पत्रकार परिषद आयोजित करण्यात आली होती, त्यावेळी श्री. कटियार यांनी ही माहिती दिली. उपजिल्हा निवडणूक अधिकारी शिवाजी शिंदे यावेळी उपस्थित होते.निवडणुका पारदर्शक आणि न्याय्य वातावरणात पार पाडण्यासाठी मतदार याद्यांचे अद्ययावतीकरण तसेच शुध्दीकरण अत्यंत महत्वपूर्ण असते. यासाठी भारत निवडणुक आयोगाकडून दरवर्षी विशेष संक्षिप्त पुनरीक्षण कार्यक्रम राबविला जातो. २७ ऑक्टोबर २०२३ रोजी जिल्हाधिकारी कार्यालय, मतदार नोंदणी कार्यालयांमध्ये व सर्व मतदान केंद्रांवर प्रारूप यादी प्रकाशित करून २०२४ च्या विशेष संक्षिप्त पुनरीक्षण कार्यक्रमाचा प्रारंभ करण्यात आला होता. हा कार्यक्रम २७ ऑक्टोबर २०२३ ते २३ जानेवारी २०२४ या कालावधीत राबविला गेला. या विशेष संक्षिप्त पुनरीक्षण कार्यक्रमांतर्गत ऑक्टोबर २०२३ च्या प्रारूप मतदार यादीत ५४ हजार १९ मतदारांची नाव नोंदणी झाली. तसेच ४७ हजार ३५७ मतदारांची वगळणी करण्यात आली. त्यामुळे अंतिम मतदार यादी ६ हजार ६६२ मतदारांची निव्वळ वाढ होऊन एकूण मतदारांची संख्या २३ लक्ष ९९ हजार १९७ इतकी झालेली आहे. त्यानुसार १ हजार १४७ पुरूष मतदारांची तर ५ हजार ५११ स्त्री मतदारांची आणि ४ तृतीयपंथी मतदारांची निव्वळ वाढ झालेली आहे. महिला बचत गट, अंगणवाडी सेविका, गृहनिर्माण सोसायट्या यांच्या सहकार्यामुळे यंदा महिलांच्या मतदार नोंदणीत लक्षणीय वाढ झालेली दिसून येते. त्यामुळे मतदार यादीतील स्त्री –पुरुष गुणोत्तर ९४० वरून ९४३ एवढे झाले असल्याची माहिती श्री. कटियार यांनी यावेळी दिली.

या पुनरीक्षण कार्यक्रमाध्ये १८ ते १९ या वयोगटामध्ये १३ हजार २६६ मतदारांची नव्याने भर पडली आहे, तसेच २० ते २९ या वयोगटात १८ हजार ३२९ मतदारांची वाढ झालेली आहे.

प्रारूप यादीत १८ ते १९ या वयोगटाची मतदार संख्या ५ हजार ४५२ (०.१६ टक्के) होती. ती जानेवारीच्या अंतिम मतदार यादीत १८ हजार ७१८ (०. ५४ टक्के) इतकी झालेली आहे. तर २० ते २९ वयोगटाची प्रारूप यादीतील मतदार संख्या ३ लक्ष ९५ हजार २१ (११.४० टक्के) होती. ती अंतिम यादीत ४ लक्ष १३ हजार ३५० (११.९३ टक्के) इतकी झालेली आहे. विविध सामाजिक संस्था, महाविद्यालये यांनी राबविलेल्या मतदार नोंदणी शिबिरांमुळे या वयोगटाच्या टक्केवारीत वाढ झाल्याचे दिसून येते.

येत्या लोकसभा व विधानसभा निवडणूकांच्या पार्श्वभूमीवर मतदार याद्या अचूक व परिपूर्ण असण्यावर भारत निवडणूक आयोगाचा भर आहे. त्यानुसार विशेष संक्षिप्त पुनरीक्षण कार्यक्रमापूर्वी जुलै ते ऑगस्ट २०२३ या कालावधीत घरोघरी सर्वेक्षणाची मोहिम राबविण्यात आली होती. या सर्वेक्षणात आढळलेल्या मृत मतदार, यादीतून वगळण्याची कार्यवाही पुनरीक्षणपूर्व कालावधीत तसेच विशेष संक्षिप्त पुनरीक्षण



कालावधीत पूर्ण करण्यात आली. त्यानुसार ७७ हजार ६१९ मृत मतदारांची नावे मतदार यादीतून वगळण्यात आली. त्याचप्रमाणे मतदार याद्यांमध्ये १७ हजार ७९२ एकसारखे फोटो असलेले मतदार (फोटो सिमिलर एन्ट्रीज) असल्याचे निदर्शनास आले. त्यांची सखोल तपासणी करून विशेष संक्षिप्त पुनरीक्षण कालावधीत ७ हजार ८४८ मतदारांच्या नावांची वगळणी करण्यात आली आहे. तसेच मतदार यादीत नाव व इतर काही तपशील समान असलेले (डेमोग्राफिकल सिमिलर एन्ट्रीज) ६ हजार ७९४ मतदार आढळून आले. त्यांची सखोल तपासणी करून २ हजार ६१३ मतदारांची नावे वगळण्यात आलेली आहेत. ही वगळणी प्रक्रिया मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांमार्फत संबंधित मतदारांच्या गृहभेटी घेऊन स्पीड पोस्टाने नोटिस पाठवून तसेच पूर्ण तपासणी करुन कायदेशीररित्या करण्यात आलेली आहे. नाव वगळणीच्या या प्रक्रियेमुळे मतदार यादीतील अनावश्यक फुगवटा नाहीसा होऊन आता ती अधिक परिपूर्ण झालेली आहे.

मतदार यादी जितकी सर्व समावेशक तितकी वंचित समाजघटक लोकशाही प्रक्रियेत सहभागी होण्याची शक्यता वाढते. त्यामुळे यंदाच्या पुनरीक्षण कार्यक्रमाचे खास वैशिष्टये म्हणजे भटक्या व विमुक्त जमातीच्या मतदार नोंदणीसाठी विशेष शिबिरे आयोजित करण्यात आली होती. या शिबिरांमध्ये मतदार नोंदणीबरोबरच आधारकार्ड, रेशनकार्ड, जातीचा दाखला यांचेही या जमातीतील लोकांना वाटप करण्यात आले. धामणगाव रेल्वे ३६, बडनेरा ३७, अमरावती ३८, तिवसा ३९, दर्यापूर ४०, अचलपूर ४२ या मतदार संघात शिबिरे घेण्यात आली होती. त्यामध्ये भटक्या व विमुक्त जमातीच्या एकूण ५५४ लोकांची मतदार नोंदणी करण्यात आली.दिव्यांग मतदारांना ये–जा करण्याच्यादृष्टिने २०२४ च्या लोकसभा निवडणुकीमध्ये सर्व मतदान केंद्र तळमजल्यावर राहणार आहेत. तसेच शहरातील लोकांची व्यग्र जीवनशैली, मतदानाबद्दल अनास्थेमुळे मोठ्या शहरांमध्ये मतदानाची टक्केवारी कमी असते. शहरी मतदारांचा सहभाग वाढविण्यासाठी १० डिसेंबर २०२३ ते २९ फेब्रूवारी २०२४ पर्यंत ईव्हीएम, व्हीव्हीपीएटी बाबत विशेष जनजागृती मोहीम कार्यक्रम राबविणे सुरू आहे.

यंदाच्या पुनरीक्षण कार्यक्रमामध्ये मतदार नोंदणीसाठी १ जानेवारी या नेहमीच्या अर्हता दिनांकासोबतच १ एप्रिल, १ जुलै आणि १ ऑक्टोबर या बहु–अर्हता तारखा ठेवण्यात आल्या होत्या. त्यामुळे ऑक्टोबर २०२४ पर्यंत १८ वर्षे पूर्ण करणाऱ्या युवांनाही या मोहिमेत आगाऊ किंवा पूर्वनोंदणी करता आली. त्या–त्या तिमाहीच्या कालावधीत १८ वर्षे पूर्ण होणाऱ्या अर्जदारांच्या अर्जावर प्रक्रिया करण्यात येणार आहे. त्यामुळे पूर्व नोंदणी केलेल्या युवांना पुन्हा अर्ज करण्याची आवश्यकता नाही. मात्र अंतिम यादी प्रसिध्द झाल्यानंतरही मतदार नोंदणीची निरंतर प्रक्रिया सुरू असल्यामुळे अद्याप नाव नोंदणी न केलेल्या युवांना मतदार नोंदणीची अजूनही संधी आहे.दि. २३ जानेवारी रोजी मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालय व जिल्हाधिकारी कार्यालयांच्या संकेस्थळावर आणि मतदार नोंदणी कार्यालयांमध्ये अंतिम मतदार याद्या प्रसिध्द करण्यात आलेल्या आहेत. मतदारांनी 'मतदाता सेवा पोर्टल' या संकेतस्थळावर https://electoralsearch.eci.gov.in/ जाऊन यादीत आपले नाव तपासावे आणि सर्व तपशील योग्य आहेत का, हे पाहावे. सोबतच मतदान केंद्रही तपासून घ्यावे, जेणेकरून ऐन मतदानाच्या दिवशी गैरसोय होणार नाही, तसेच यादीत नाव नसलेल्या नागरिकांनी सहा क्रमांकाचा अर्ज भरून आपला मताधिकार सुनिश्चित करावा तसेच सर्व राजकीय पक्षांनीही आपापल्या पक्षामार्फत मतदान केंद्रस्तरीय प्रतिनिधींच्या (बीएलए) नियुक्त्या करून त्यांच्या माध्यमातून मतदारांना यादीत नाव तपासण्यास आणि नावे नसलेल्यांना मतदार नोंदणीस सहाय्य करावे, असे आवाहन जिल्हाधिकाऱ्यांनी यावेळी केले. नागरिकांना मतदार नोंदणी कार्यालयात प्रत्यक्ष मतदार नोंदणी करता येईल. तसेच 'मतदाता सेवा पोर्टल' आणि 'वोटर हेल्पलाइन प' यावर ऑनलाईन नाव नोंदणीची सुविधाही उपलब्ध आहे, अशी माहिती उपजिल्हा निवडणूक अधिकारी श्री. शिंदे यांनी दिली.

# निधी मागणीचे प्रस्ताव पाठविले, ४९० जोडप्यांचे प्रोत्साहन अनुदान अडले

**दि.२४विदर्भ प्रजासत्ताक अमरावती** – जातीभेद निर्मूलनासाठी आंतरजातीय विवाहाला प्रोत्साहन देणाऱ्या शासनाच्या दप्तर दिरंगाईमुळे जोडप्यांना ऑक्टोबर २०२१ पासून ५० हजारांच्या अनुदानापासून वंचित ठेवले आहे. त्यामुळे नोंदणी विवाह केलेले ४९० जोडप्या शासनाविरोधात तीव्र संताप व्यक्त करत आहे.

लग्नानंतर संसारोपयोगी वस्तूंची खरेदी करण्यासह नव्याने संसार थाटण्यासाठी हे अनुदान आंतरजातीय विवाह करणाऱ्या जोडप्यांच्या कामी येते. मात्र, दोन ते अडीच वर्षापासून अनुदानच मिळाले नसल्याने, या योजनेच्या उद्देशालाच हरताळ फासला गेला आहे. बहुतेक वेळा आंतरजातीय विवाह करणारे जोडपे कुटुंबापासून वेगळे राहतात. नव्याने संसार थाटण्यासाठी त्यांना अनुदानाचा आधार असतो. काही आर्थिक परिस्थिती बेताची आहे. नोंदणी विवाहानंतर अनुदानासाठी अर्ज करणाऱ्या काहींना मुले झाली तरी अद्याप अनुदान मिळाले नाही. शासनाकडे वारंवार पाठपुरावा अनुदान मिळाले



नाही.

राज्य शासनाच्या सामाजिक न्याय विभागातर्फे १९५८ पासून आंतरजातीय विवाह करणाऱ्या जोडप्यांना अनुदान दिले जाते. यात अनुसूचित जाती अनुसूचित जमाती विमुक्त जाती भटक्या जनजाती बौद्ध विशेष मागास वर्गातील पुरुष किंवा महिलांनी सवर्ण हिंदू लिंगायत जैन सिंह धर्मातील पुरुष किंवा महिलेशिवाय केल्यास ५० हजाराचे प्रोत्साहन अनुदान दिले जाते.

### पाठपुरावा सुरू असला तरी अद्याप अनुदान नाही

आंतरजातीय विवाहांना प्रोत्साहन देण्यासाठी शासनाकडून अनुदान दिले जाते. परंतु, सतत पाठपुरावा सुरू आहे. ऑक्टोबर २०२१ पासून अनुदान आले नाही. अनुदान उपलब्ध होताच पात्र लाभार्थ्यांना निकषानुसार लाभ दिला जाईल

**–राजेंद्र जाधवर,** जिल्हा समाज कल्याण अधिकारी.जि.प. अमरावती

### आंतरजातीय विवाहाच्या संख्येत वाढ

समाजकल्याण विभागाकडे ऑक्टोबर २०२१ पासून ४९० जोडप्यांनी नोंदणी विवाहानंतर अर्ज केले. तत्पूर्वी वर्षाला ७० ते ८० जोडपे प्रोत्साहन अनुदानासाठी अर्ज करायचे. परंतु, आंतरजातीय विवाहाच्या संख्येत वाढ झाल्यामुळे प्रोत्साहन अनुदानासाठी अर्ज करणाऱ्यांची संख्या वाढली आहे. जानेवारी ते नोव्हेंबर २०२३ पर्यत १२५ नवीन जोडप्यांनी अर्ज केले.

कोणत्याही शंका किंवा अभिप्रायासाठी आम्हाला ईमेल करा –prajasattaknews24gmail.com
या पृष्ठावरील जाहिरातींसाठी किंवा मोफत अंक मो.वर मिळण्यासाठी संपर्क मो.८६२४९८५६३३, प्रिंट / PDF / वेब – पोर्टल /ई – पेपर

# आमदार ॲड.ठाकूर यांचा गाडगेबाबांच्या शैलीत ढोंगबाजीवर प्रहार





**दि.२४ विदर्भ प्रजासत्ताक तळेगाव ठाकूर** – या देशाचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांनी धरणे बांधली, अत्याधुनिक महाविद्यालय उभारली कारण त्यांना पाण्याचा आणि शिक्षणाचे महत्त्व माहीत होतं त्यांनी लोकांच्या भावनांशी खेळून ढोंगबाजी करण्याचा कधीच प्रयत्न केला नाही, आता सिलेंडरचे भाव गगनाला मिळवायचे आणि लोकांना धर्माच्या नावाखाली फसवायचं हा खेळ सुरू आहे असा प्रहारकाँग्रेसच्या ज्येष्ठ नेत्या आणि आमदार ॲड. यशोमती ठाकूर यांनी केला. तळेगांव ठाकूर येथे आयोजित हळदीकुंकू समारंभात बोलताना त्यांनी गाडगेबाबांच्या शैलीत देशात सुरू असलेल्या ढोंगबाजीचा समाचार घेतला. प्रभू रामचंद्राच्या प्राणप्रतिष्ठा सोहळ्याचा सर्वांना आनंद आहे मात्र हा सोहळा करत असताना केवळ जनतेची दिशाभूल केली आहे. सर्वसामान्यांच्या मनात असलेले प्रभू रामचंद्राचे रूप म्हणजे मर्यादा पुरुषोत्तम राम, कुटुंबवत्सल राम अशी प्रतिमा आहे. श्री रामा सोबत आम्ही नेहमीच सीतामय्या लक्ष्मणजी आणि हनुमान जी यांना पाहत आलो आहे. मात्र, आता केवळ प्रभू रामचंद्राची धनुरधारी मूर्ती स्थापन करण्यात येत आहे. आपण सर्वजण संविधान मांनणारे आहोत. देशातील काही शक्ती सध्या संविधान तुडवू पाहत आहे, देशाची प्रगती ही मंदिरांमध्ये नाही शिक्षणामध्ये आणि मूलभूत गोष्टींच्या विकासामध्ये आहे. म्हणूनच या देशाचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांनी भाकरा नानगल सारखे धरण बांधले, आयटीआय पार्क उभे केले. मात्र सध्या या सर्व गोष्टींना फाटा देत केवळ जनतेच्या भावनांची खेळ करण्याचा प्रयत्न सुरू आहे असे म्हणत त्यांनी उपस्थित महिला आणि मुलींना गाडगेबाबांच्या शैलीत काही प्रश्न विचारले आणि प्रबोधन करण्याचा प्रयत्न केला. सिलेंडरचे भाव गगनाला भिडवणाऱ्या लोकांना आता धडा शिकवायची वेळ आली आहे. त्यासाठी आता कोणीही मागे राहू नका, आपणही कशा पद्धतीने संघर्ष करून समाजसेवेमध्ये कार्यरत आहोत याची आठवण करून देताना त्या स्वतः भावूक झाल्या, मात्र या परिस्थितीशी लढण्यासाठी नवीन पिढी अधिक बलवान करण्यासाठी आपण संघर्ष केला पाहिजे असा नारा त्यांनी यावेळी दिला. रामचंद्र युवक कल्याण मोझरी या संस्थेच्या वतीने गारमेंट प्रशिक्षण प्रमाणपत्र प्रदान करण्याचा आणि महिलांच्या हळदी कुंकू चा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यावेळी संस्थेच्या वतीने महिला भगिनिंच्या कलागुणांना वाव देण्यासाठी आणि सुप्त गुणांना संधी देण्यासाठी परी हू मैं या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. परी हू मैं या कार्यक्रमाचे संचालन अमरावती जिल्ह्यातील सुप्रसिद्ध हास्य कलाकार मंगेश ठाकरे यांनी केले. यावेळी सुनिता अळसपुरे, कल्पना दिवे, रोशनी पुनसे, दर्शना मारबते, शिल्पा हांडे, प्रिती भुरभुरे, अर्चना भोंबे, सुनिता बाखडे, संगिता राऊत, रुपाली काळे, मनुबाई वरठी, वैशाली धुमोने, पुनम काळमेघ, तृप्ती निस्ताने, जयश्री वानखडे या महिला पदाधिकाऱ्यांसह गावातील महिलांची उपस्थिती लक्षणीय होती. यावेळी महिलांनी स्मरणशक्ती तसेच वक्तृत्व स्पर्धा आणि कलर मॅचिंग स्पर्धेत उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला. यावेळी महिलांनी स्मरणशक्ती तसेच वक्तृत्व स्पर्धा आणि कलर मॅचिंग स्पर्धेत उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला.

### नवसारी प्रभाग मध्ये धार्मिक कार्यक्रमातुन सामाजिक उपक्रम

# ३१ भजनी मंडळींचा सन्मान सत्कार देशात खऱ्या राम राज्याला सुरुवात झाली:– आमदार प्रविण पोटे पाटील




**दि.२४विदर्भ प्रजासत्ताक अमरावती–** संपूर्ण ठिकाणी मोठ्या थाटामाटातश्रीराम जन्मभूमी अयोध्या प्राणप्रतिष्ठा निमित्त कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते त्याच बरोबर अमरावती शहरात भंजन संध्या व महाआरतीचे आयोजन तसेच या कार्यक्रमत ३१ भंजनी मंडळी यांचा सत्कार करण्यात आले,राम खिचडी व २१०० लाडू चे वाटप यावेळी करण्यात आले .ऋषिकेश देशमुख मित्र मंडळ व राजाराम प्रतिष्ठान च्या वतीने आयोजित करण्यात आला, राजाराम प्रतिष्ठान च्या माध्यमातून सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, क्रीडा , धार्मिक, व ईतर कार्यक्रम राजाराम प्रतिष्ठान व ऋषिकेश देशमुख मित्र मंडळाच्या च्या माध्यमातून कार्यक्रम आयोजित करण्यात येतात. सोबतच दिनांक २२ जानेवारी भंजन संध्या,व महाआरती चे आयोजन करण्यात आले होते आपल्याला अयोध्या या ठिकाणी जरी जाता आले नाही मात्र आपण या कार्यक्रमाला उपस्थित राहुन कार्यक्रमचा आनंद घ्या असे आपल्या सर्वांना ऋषिकेश देशमुख मित्र मंडळ व राजाराम प्रतिष्ठान च्या वतीने आव्हान करण्यात आले होते या भव्य दिव्य कार्यक्रमाला हजाराहून जास्त भाविक भक्त उपस्थित होते .

# श्री शिवाजी शिक्षण संस्थेच्या वतीने नेताजी सुभाषचंद्र बोस जयंती साजरी



**दि.२४विदर्भ प्रजासत्ताक अमरावती–** नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या जयंतीनिमित्त श्री शिवाजी शिक्षण संस्थेच्या वतीने अभिवादन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. संस्थेचे अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख यांच्या अध्यक्षतेत शिवाजी कृषी जैवतंत्रज्ञान महाविद्यालयाच्या परिसरात आयोजित या सोहळ्याला माजी राज्यमंत्री व नेताजी स्मारक समितीचे अध्यक्ष सुरेंद्र भुयार प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. संस्थेचे कोषाध्यक्ष दिलीपबाबू इंगोले, कार्यकारिणी सदस्य सुरेशदादा खोटरे, प्रा.सुभाषराव बनसोड, माजी उपाध्यक्ष महादेवराव भुईभार स्वीकृत सदस्य तथा डॉ.पंजाबराव देशमुख अर्बन को-ऑप बँकेचे अध्यक्ष नरेशचंद्र पाटील प्रामुख्याने उपस्थित होते. नेताजी स्मारक समितीचे अध्यक्ष सुरेंद्र भुयार यांनी आपल्या भाषणातून नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या कार्यावर प्रकाश टाकला तर कार्यक्रमाचे अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख यांनी भाऊसाहेब डॉ.पंजाबराव देशमुख व नेताजी यांच्यातील स्नेह संबंधावर प्रकाश टाकला. व त्यांच्या कार्याचेही स्मरण वक्त्यांनी आपल्या भाषणातून केले.कार्यक्रमाच्या प्रारंभी नेताजी सुभाषचंद्र बोस, आणि डॉ.पंजाबराव देशमुख यांच्या प्रतिमेला हारार्पण करून अभिवादन करण्यात आले. नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या पुतळ्याला पुष्पांजली अर्पण करून मानवंदना देण्यात आली. कार्यक्रमाचे संचालन डॉ.पंकज वानखडे यांनी तर कृषी जैवतंत्रज्ञान महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ.दिपाली भारसाकळे यांनी प्रास्ताविक व पाहुण्यांचे स्वागत केले.प्रा.अतुल डांगे यांनी आभार मानले.कार्यक्रमाला संस्थेच्या सर्व महाविद्यालयाचे प्राचार्य,प्राध्यापक, अधिकारी व कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# धारातीर्थ गडकोट जाणाऱ्या स्पेशल गाडीला खा.नवणीत राणा व खा.डॉ अनिल बोंडे यांनी दाखविली हिरवी झेंडी

### श्री राम, श्रीमंत शिवाजी महाराज व संभाजी महाराज , भारत माता की जय जय घोषाने स्टेशन दुंमदूमला



**दि.२४विदर्भ प्रजासत्ताक अमरावती.–** श्री शिवप्रतिष्ठान हिंदुस्तान द्वारे दरवर्षी गडकोट मोहिमेचे आयोजन करण्यात येते हि यात्रासाठी स्पेशल गाडी अमरावती येथून सातारा जिल्हा अशी सूरू करावी अशी मागणी खासदार नवनीत राणा यांच्या कडे करत त्यांनी या संबंधाने रेल मंत्री, राज्य मंत्री, मुख्य महाव्यवस्थापक रेल मुंबई यांना पत्र पाठवून हि मागणी रेल विभागाने मान्य करत आज श्री दुर्ग्र रायरेश्वर ते श्री दुर्ग प्रतापगड या वर्षी २४ जानेवारी ते २८ जानेवारी पर्यंत आयोजित केली आहे. त्याकरिता अमरावती वरुन विशेष रेल गाडी संख्या ०११५५ आज सोडण्यात आली या गाडीला खा.नवणीत राणा व खासदार राज्यसभा डॉ.आनिलजी बोंडे यांनी आज हिरवी दाखविली तत्पूर्वी खा.नवनीत राणा यांनी श्रीमंत शिवाजी महाराजांच्या पुतळ्याला पुष्पहार घालून पूजन केले. शुभेच्छा देताना युवा युवा पिढीला छत्रपती शिवरायांचे आदर्श छत्रपती शिवरायांचा त्याग कळावा याकरिता श्री शिवप्रतिष्ठान हिंदुस्तान द्वारे दरवर्षी गडकोट मोहिमेला शुभेच्छा हि दिल्या.अमरावती स्थानकावर झालेल्या विशेष कार्यक्रमात सर्व धारकरी माननीय खासदार सौ नवनीत राणा व माननीय खासदार अनिलजी बोंडे ,जेष्ट विधितन्य प्रशांत जी देशपांडे ,समाजसेवक चंद्रकुमार उर्फ लप्पी जजोदिया ,किरनजी पातुरकर, उमेश ढोणे, अर्चित जाजोदिया, यांची उपस्तीथी यांचा सत्कार करण्यात आला.

या वेळेस झालेल्या कार्यक्रमात श्री शिवप्रतिष्ठान हिंदुस्थानच्या सर्व धारकऱ्यांनी माननीय खासदार सौ नवनीत जी राना व माननीय खासदार अनिलजी बोंडे साहेब यांचे त्यांनी धारकऱ्यांना स्पेशल गाडी उपलब्ध करून दिल्या खूप खूप आभार मानले .श्री शिवप्रतिष्ठान हिंदुस्थानच्या धारकार्या सोबत खंबीरपणे त्यांच्या प्रत्येक कार्यात पाठीशी उभे राहतात. त्याकरिता श्री शिवप्रतिष्ठान हिंदुस्थान धारकरी यांनी खासदार नवनीत राणा, खासदार डॉ बोंडे यांचे आभार मानले.

# राज्यात आता १०८ रुग्णवाहिकांची संख्या होणार १७५६

**दि.२४विदर्भ प्रजासत्ताक अमरावती** – राज्यातील नागरिकांसाठी १०८ रुग्णवाहिका जीवनदायिनी ठरली आहे. सद्यस्थितीत ९३७ रुग्णवाहिका राज्याच्या विविध भागात कार्यरत असून, नव्याने ८१९ रुग्णवाहिका येणार असल्यामुळे एकूण १,७५६ रुग्णवाहिका राज्याच्या विविध भागात सेवा देणार आहेत. डव्हान्स लाईफ सपोर्ट, बेसिक लाईफ सपोर्ट व बाईक ब्युलन्स या प्रकारात ही सेवा पुरवली जाते. या सेवेत नवजात बालकांसाठी विशेष रुग्णवाहिका व बोट ब्युलन्सचा नव्याने समावेश करण्यात आला आहे. समुद्र, व नद्यांमध्ये बुडून मृत्युमुखी पडणार्या नागरिकांची वाढती संख्या लक्षात घेता, नव्याने ३६ बोट म्बुलन्स विविध अपघाती समुद्र किनारे व नदी पात्रांमध्ये तैनात होणार आहे. त्याचबरोबर नवजात शिशूंसाठी २५ रुग्णवाहिका नव्याने येणार आहेत. रुग्णवाहिकेची संख्या वाढल्याने १०८ क्रमांकावर कॉल केल्यानंतर रुग्णवाहिकेचा प्रतिसाद देण्याची वेळ कमी होणार आहे.

**शासनावर ३० कोटीचा अतिरिक्त बोजा वाढणार–** दहा वर्षापुर्वी १०८ रुग्णवाहिका सुरु करण्यासाठी निविदा काढण्यात आली होती. त्याचा सर्व भांडवली खर्च शासनाच्या वतीने करण्यात आला होता. नविन निविदेनुसार ५१ टक्के भांडवली खर्च सेवा पुरवठा करणार्या संस्थेला करावा लागणार आहे. त्यामुळे सदर निविदा १० वर्षांसाठी काढण्यात आली आहे. १०८ रुग्णवाहिकेसाठी सद्यस्थितीत प्रती महिना ३३ कोटी रुपये शासनाला खर्च करावे लागत होते. रुग्णवाहिकेच्या वाढत्या संख्येमुळे प्रती महिना ६३ कोटी रुपये शासनाला खर्च करावे लागणार आहे. एकंदरीतच अतिरिक्त ३० कोटी प्रतीमहिना शासनाला खर्च करावा लागणार आहे.

### सद्यस्थितीत रुग्णवाहिकांची संख्या



डव्हान्स लाईफ सपोर्ट : २३३
बेसिक लाईफ सपोर्ट : ७०४
बाईक म्बुलन्स : ३३

**नव्याने वाढणाऱ्या रुग्ण वाहिकांची संख्या**

डव्हान्स लाईफ सपोर्ट : २५
बेसिक लाईफ सपोर्ट : ५७०
बाईक म्बुलन्स : : १६३
नवजात शिशुंसाठी रुग्णवाहिका : २५, बोट म्बुलन्स : ३६

# डॉ. मुकुंदराव के. पवार शैक्षणिक संकुलामध्ये श्रीराम प्राणप्रतिष्ठा दिवस

### ८३ विद्यार्थ्यांनी सादर केले रामायण नाटिका



**दि.२४विदर्भ प्रजासत्ताक धामणगाव रेल्वे–** येथील डॉ. मुकुंदराव के. पवार शैक्षणिक संकुलामध्ये मर्यादा पुरुषोत्तम दिलेले वचन पाळणारा पुत्र म्हणजे श्रीराम एक पत्नी व्रत व योग्य मार्गदर्शक आदर्श प्रतिभावंत राजा श्रीरामचंद्र प्रभू यांच्या जन्मभूमी मध्ये श्रीराम प्राणप्रतिष्ठा दिवस कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.यावेळी रामायण नाटकेने विद्यार्थी भारावले.

कार्यक्रमाची सुरुवात दीप प्रज्वलन व श्री राम यांच्या प्रतिमा पूजन करून रामरक्षा स्तोत्राने करण्यात आली. कार्यक्रमाला संस्थेचे सचिव शिवाजीराव पवार,समन्वयक प्रा.जया केने, उपप्राचार्य दीप्ती हांडे यांनी प्रतिमा पूजन करून हार अर्पण केले. यावेळी संपूर्ण जागोजागी सुंदर रांगोळ्यांनी सजावट करण्यात आली होती, जणू दिवाळीच आहे असे यावेळी वाटत होते सर्वत्र दिव्यांची झगमगट करण्यात आलेली होती. यावेळी सुंदर रामायणातील भजन विद्यार्थ्यांनी सादर केले.कार्यक्रमाचा मुख्य भाग म्हणजे रामायण या नाटिकेतील दृश्यांनी संपूर्ण विद्यार्थी भारावुन गेले, या नाटिकेमध्ये शाळेतील एकूण ८३ विद्यार्थी सहभागी झाले होते. या नाटिकेमध्ये मंथरा व कैकयी संवाद, राम वनवास,भरत भेट, सीता हरण, वानर सेना, रामसेतू,राम हनुमान भेट, अशा विविध देखावे तयार करण्यात आले होते. या नाटीकीतील वर्ग पहिलीच्या विद्यार्थ्यांनी वानरसेनांची भूमिका घेतल्याने सर्व विद्यार्थी व शिक्षकांचे लक्ष वेधून घेतले. सोबतच श्रीराम यांची पालखी यात्रा सोहळा दाखविण्यात आला, त्यामध्ये सर्व विद्यार्थी आनंदाने सहभागी झाले व शिक्षकही उत्साहाने सहभागी झाले.जणू अयोध्येचे स्वरूप डॉ. मुकुंदराव के. पवार शैक्षणिक संकुलाला आलेले होते. या नाटिकेचे सूत्रसंचालन हनुमंत ठाकरे यांनी केले, संगीत देण्याचे काम काजल मुन, सोबतीला वैशाली धडके, प्रणिता शेंडे यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ज्योती राठोड यांनी केले या कार्यक्रमासाठी अजय सुलताने, महेश धांदे, हर्षल पाटील, श्रेयस लायस्कर, राहुल नाकाडे, संजय मसराम, माधुरी शेलोकार, श्वेता कांबळे, रवी मारबदे, राहुल देशमुख, निखिल दामोधर प्रतीक दिवेकर रवी भगवे यांनी सहकार्य केले. कार्यक्रमाचा शेवट पसायदानाने करण्यात आला.

# तिवसा तहसीलवर प्रहारचे नतमस्तक आंदोलन

**दि.२४विदर्भ प्रजासत्ताक तिवसा** – तिवसा तालुका हा अवकाळी ग्रस्त यादीमध्ये समाविष्ट करावा या मागणीसाठी आज मंगळवार दि.२३रोजी प्रहार जनशक्ती पक्षाच्या वतीने येथील तहसील कार्यालयावर नतमस्तक आंदोलन करण्यात आले.यावेळी तहसीलदार यांच्या विरोधात शेतकऱ्यांनी जोरदार घोषणा दिल्या. अमरावती जिल्ह्यातील तिवसा तालुक्यात अवकाळी पावसाचे नुकसान असताना देखील तालुका हा यादीतून वगळण्यात आला. हाती येणाऱ्या पिकांचे प्रचंड नुकसान होऊन तिवसा महसूल विभागाने तालुक्यात कुठेही नुकसान नाही असा अहवाल जिल्हा प्रशासनाकडे पाठविला. त्यामुळे तालुक्यातील नुकसान ग्रस्त शेतकऱ्यांना मदतीपासून वंचित राहावे लागले आहे. निवेदन,आंदोलन करून देखील महसूल प्रशासनाने शेतकऱ्यांची दाखल घेतली नाही.त्यामुळे



आज संताप्त शेतकऱ्यांनी तिवसा तहसील कार्यालयावर तहसीलदार यांच्या निषेदार्थ पायऱ्यावर नतमस्तक होऊन आंदोलन केले.यावेळी प्रहारचे पदाधिकारी व तालुक्यातील शेतकरी उपस्थित होते.

# राम हा कुणा एकाचा देव नसून तो मानवातील देवत्वाचे प्रतीक - डॉ.अविनाश मोहरील

**दि.२४विदर्भ प्रजासत्ताक बडनेरा** – अयोध्या ही एक नगरी नसून ती भारतीयांची अस्मिता आहे असे प्रतिपादन डॉ अविनाश मोहरील यांनी २२ जानेवारी रोजी गोडबोले राम मंदिर येथे झालेल्या व्याख्याना प्रसंगी बोलतांना व्यक्त केले.

बडनेरा येथील गोडबोले राम मंदिर येथे प्रभू श्रीराम प्राणप्रतिष्ठा सोहळ्याच्या निमित्याने डॉ अविनाश मोहरील यांचे राममंदिर ते राष्ट्रमंदिर या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते या वेळी बोलतांना डॉ.अविनाश मोहरील म्हणालेत की राम हा कुणा एकाचा देव नसून तो मानवातील देवत्वाचे प्रतीक आहे. हजारो वर्षापासूनचा इतिहास बघितला तर प्रत्येक वेळी अयोध्येवर आक्रमण केल्याचे दिसते मग अश्यावेळी आपण स्वतःला प्रश्न विचारला पाहिजे की प्रत्येक वेळी अयोध्याच का ?? कारण शत्रूला माहिती होते की जर भारतावर राज्य करायचे असेल तर भारताची अस्मिता असलेले अयोध्येवर वार करावा लागेल. कारण असा वार केल्याने हिंदुराष्ट्र हे मनाने खचेल आणि मनाने खचलेल्या राज्यावर सहज विजय मिळवता येईल. राममंदिर ते राष्ट्रमंदिर हा विषय समजून घेतांना राष्ट्रमंदिरकसे निर्माण करता येईल याचा प्रत्येक नागरिकाने विचार करण्याची गरज आहे असे डॉ मोहरील म्हणाले. आज आपण जितक्या उत्साहात,जल्लोषात रामलल्लाचे स्वागत केले हाच उत्साह कायम ठेवून राम ही राष्ट्रीय अस्मिता जपण्याचा प्रयत्न करूया. आजच्या या



पावन दिनी रामाची प्रतिमा पुन्हा त्याच्याच हक्काच्या जागी उभी राहातांना पाहून सर्वांचे अश्रू अनावर झालेत , कारसेवकांच्या डोळ्यातून आनंदाश्रू वाहू लागले. प्राचार्य डॉ अविनाश मोहरील यांनी शरयू नदीला आज काय वाटलं असेल हे त्यांच्या मोहक शब्दात सांगितले , ते म्हणाले की आज परत माझ्या रामाला अस बघून खऱ्या अर्थाने त्याचा दुसरा वनवास सुटला असे वाटले . पहिला वनवास कौशल्या मातेने दिलेला आणि दुसरा मोगलांनी. मात्र दुसरा वनवास हजरो वर्षे चालला. हा आता बघवेनासा झाला होता . माझा राम त्याच्याच मंदिरापासून वंचित होता पण विश्वहिंदू परिषदेच्या प्रयत्नाने आज माझा राम परत आलाय. या अयोध्येलाच नव्हे तर सम्पूर्ण भारतभूमी ला आनंद झालाय. एरवी दुःखाच्या अश्रूंची दुधडी भरून वाहणारी शरयू आज आनंदाच्या अश्रूंची दुधडी भरून वाहत आहे. होय माझा राम परत आलाय ...होय माझा राम परत आलाय. राम हा कुण्या एकाचा देव नाहीय.तर राम हा उत्तम शासकाचे प्रतीक आहे ,राम हे मानवतेचे प्रतीक आहे , राम पुषोत्तम आहे म्हणून रामाप्रति असलेलं प्रेम , अस्मिता एक दिवस दाखवून चालणार नाही तर त्याची ज्योत कायम मनात तेवत राहिली पाहिजे, एक पिढी नव्हे तर हजरो पिढ्याच्या मनात राम ही अस्मिता तेवत ठेवूया आणि राममंदिर ते राष्ट्रमंदिरनिर्माण करण्यासाठी सर्व सज्ज होऊयात असे डॉ. मोहरील म्हणाले. त्यावेळी बोलत असतांना श्रोते तर मंत्रमुग्ध झालेत पण डॉ अविनाश मोहरील यांना मात्र रामल्लाचे रूप पाहून अश्रू अनावर झालेत.या व्याख्यानाला बडनेरा तसेच अमरावती शहरातील विविध क्षेत्रातील मान्यवर व नागरिक मोठया संख्येने उपस्थित होते.

## संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या कुलगुरुपदी

# डॉ मिलिंद बारहाते यांची नियुक्ती

### राज्यपालांकडून सीओईपी'च्या कुलगुरुपदी डॉ सुनील भिरुड यांची नियुक्ती

**दि.२४विदर्भ प्रजासत्ताकअमरावती** राज्यपाल तथा कुलपती रमेश बैस यांनी आज डॉ विजय जनार्दन फुलारी यांची छत्रपती संभाजीनगर येथील डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या कुलगुरुपदी नियुक्ती केली.डॉ विजय फुलारी हे शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर येथे वरिष्ठ प्राध्यापक असून ते भौतिकशास्त्र विभागाचे प्रमुख होते.राज्यपालांनी नागपूर येथील सी पी अँड बेरार महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ मिलिंद अरविंद बारहाते यांची संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या कुलगुरूपदी नियुक्ती केली आहे.राज्यपाल बैस यांनी



डॉ सुनील गंगाधर भिरुड यांची शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय पुणे तंत्रज्ञान विद्यापीठाच्या कुलगुरुपदावर नियुक्ती केली आहे. डॉ भिरुड हे वीरमाता जिजाबाई तंत्रज्ञान संस्थेत संगणक अभियांत्रिकी व माहिती तंत्रज्ञान विभागात प्राध्यापक पदावर काम करीत आहेत.सर्व कुलगुरुंची नियुक्ती ते पदभार स्वीकारल्याचे दिनांकापासून पाच वर्षांच्या कार्यकाळासाठी किंवा संबंधित कुलगुरु वयाची ६५ वर्षे पूर्ण करीपर्यंत करण्यात आली आहे.

# उद्याला अमरावतीत भव्य विजयग्रंथ सामूहिक पारायण सोहळा

### हिंदूहृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे जयंती महोत्सवानिमित्त शिवसेनेचे आयोजन

**दि.२४विदर्भ प्रजासत्ताक अमरावती** शिवसेनाप्रमुख हिंदूहृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात येणार असून त्यानिमित्त आयोजित जयंती महोत्सवात अमरावती जिल्हा शिवसेना शाखेतर्फे विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमाचा एक भाग म्हणून २५ जानेवारी रोजी अंबानगरी अमरावतीत भव्य दिव्य



असा विजयग्रंथ सामूहिक पारायण सोहळा होणार आहे .शिवसेना जिल्हाप्रमुख सुनील खराटे यांच्या पुढाकारातून वंदनीय बाळासाहेब ठाकरे जयंती महोत्सव आयोजित करण्यात आला असून या महोत्सवाचा प्रारंभ २५ जानेवारी रोजी विजय ग्रंथ सामूहिक पारायण सोहळ्याने होणार असून साईनगर, बेनाम चौक स्थित प्रांगणात हा भव्य दिव्य पारायण सोहळा होणार आहे. २५ जानेवारी रोजी रोजी सकाळी सात वाजता सामूहिक पारायण वाचन सोहळ्यात सुरुवात होऊन ते दुपारी तीन वाजेपर्यंत चालणार आहे .श्री गुरुपुष्याच्या योगावर होणाऱ्या सोहळ्यात पुणे येथील डॉक्टर गजानन खासनीस हे व्यासपीठावरून पारायण वाचन करणार आहे.दुपारी चार वाजता महाप्रसादाने या सोहळ्याची सांगता होईल अशी माहिती कार्यक्रमाचे आयोजक शिवसेना जिल्हाप्रमुख सुनील खराटे यांनी



एका प्रसिद्धी पत्रकारे पत्रकाद्वारे दिली आहे.

सदर विजय ग्रंथ सामूहिक पारायण सोहळ्यात हजारो अमरावतीकर गजानन भक्त सहभागी होऊन पारायण वाचन करणार आहे.

तरी भाविक भक्तांनी सामूहिक पारायण सोहळ्यात सहभागी होऊन महाप्रसादाचा लाभ घ्यावा असे आवाहन शिवसेना जिल्हाप्रमुख सुनील खराटे यांनी केले आहे

# नेताजी सुभाषचंद्र बोस यांचे विचार, कर्तुत्व अनुकरणीय व्हावे

## आमदार श्रीकांत भारतीय यांचा आशावाद

दि.२४विदर्भ प्रजासत्ताकअमरावती – १६

भारताचा 'डीएनए' हा सामाजिक उत्सवांचा आहे. प्रत्येक व्यक्ती हा नेताजी सुभाष चंद्र बोस, छत्रपती शिवाजी महाराज, राष्ट्रमाता मासाहेब जिजाऊ होऊ शकत नसला तरी त्यांच्या दिशेने, त्यांच्या पदचिन्हानवर समाजोन्नतीसाठी वाटचाल करणे गरजेचे आहे. नेताजी सुभाष चंद्र बोस यांचे विचार, कर्तुत्व प्रत्येक भारतीयांसाठी आचारणीय व्हावे, माँ.जिजाऊंचा स्वराज्य निर्मितीचा विचार हा राष्ट्राच्या जडणघडणीत उपयुक्त आहे, असा आशावाद विधान परिषदेचे आमदार सर्वश्री श्रीकांत भारतीय यांनी मंगळवारी (ता.२३) व्यक्त केला. स्थानिक जिजाऊ कमर्शियल को-ऑपरेटिव बँकेत संस्थापक अध्यक्ष इंजि.अविनाश कोठाळे, उपाध्यक्ष प्रदीप चौधरी यांच्या अध्यक्षतेखाली नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या जयंती निमित्त कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यावेळी विचार व्यक्त करताना भारतीय हे बोलत होते.

दरम्यान ते म्हणाले, शिवरायांनी अठरापगड जातीच्या नागरिकांना एकत्र करून रायरेश्वराच्या मंदिरात स्वराज्याची शपथ घेतली. यामागे राष्ट्रमाता माँसाहेब

## जिजाऊ बँकेत जयंती उत्साहात साजरी



जिजाऊ यांची प्रेरणा होती. समाजातील सर्वांना एकत्रितपणे एकतेचा संदेश देऊन स्वराज्य व स्वराष्ट्रनिर्मितीचा विचार त्यांनी दिला. त्यामुळे या आदर्शांवर चालण्यात समाजाचे हित आहे असे सांगत आ.श्रीकांत भारतीय यांनी जिजाऊंच्या विचारांचे खरे वारसदार हे अविनाश कोठाळे असल्याचे नमूद केले. बँकेच्या विकासाचं व्रत, वसा आणि वारसा चालवताना अनंत अडचणींना समोर जावे लागते. ही कसरत करताना परिश्रम घ्यावे लागतात. त्यातूनच आज जिजाऊ कमर्शियल को-ऑपरेटिव्ह बँकेने प्रगतीचे शिखर गाठले आहे. बँकेच्या माध्यमातून अमरावती व विदर्भातील नागरिक आर्थिकदृष्ट्या उभा होईल यासाठी बँकेत सदैव प्रयत्नशील राहिल. कोणावरही अन्याय होणार नाही याची काळजी सर्व संचालक मंडळांच्या माध्यमातून घेतली जाते. 'माझी बँक' म्हणून जिजाऊ बँकेच्या आपण सदैव पाठीशी उभे राहू असेही श्रीकांत भारतीय यांनी अधोरेखित केले. यावेळी माजी महापौर चेतन गावंडे, माजी स्थायी समिती सभापती तुषार भारतीय, प्रशांत शेगोकार, सुरेखा लुंगारे, संचालक श्रीकांत टेकाळे, संचालक नितीन डहाके, व्यवस्थापन मंडळाचे सदस्य वासुदेव बुरंगे, बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी नितीन वानखडे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी हरिष नाशिरकर, प्रशासन अधिकारी अर्चना बारबुद्धे, मंजूषा वैद्य, विजय ढोबे, किरण दिवाण, राजेंद्र कडू, मनिष देशमुख, हर्षल भाले, दिपक मेटे, प्रशांत बारबुद्धे, राजेंद्र राऊत, सागर राऊत, वैकुंठ साळुंखे, योगेश चांदूरकर, भारती लामसे, नमिता ठाकरे, शुभांगी कोंडे, गणेश कडू, राजेश ठाकरे, पंडीत मोरसे यांच्यासह बँकेचे अधिकारी कर्मचारी मोठ्यासंख्येने उपस्थित होते.

### भारतीय यांचा बँकेतर्फे गौरव

विधानपरिषदेचे आमदार सर्वश्री श्रीकांत भारतीय यांचा बँकेतर्फे अध्यक्ष इंजि.अविनाश कोठाळे, उपाध्यक्ष प्रदीप चौधरी यांनी शॉल, श्रीफळ, पुष्पगुच्छ, सन्मान चिन्ह व राष्ट्रमाता माँसाहेब जिजाऊ यांचे ग्रंथ देऊन सत्कार केला. दरम्यान बँकेच्या प्रगतीची माहिती, बँकेचे कामकाज, आर्थिक नियोजन, विकासात्मक बीबींचे प्रदर्शन देखिल अविनाश कोठाळे यांनी त्यांना दखविले.

# सुनेला वाचविण्यासाठी सासूने हात दिला अन् दोघीही बुडाल्या

### गणपूर नाव दुर्घटनेमुळे गडचिरोली जिल्ह्यात हळहळ

**दि.२४विदर्भ प्रजासत्ताक गडचिरोली** : चामोर्शी तालुक्यातील गणपूर (रै) जवळील वैनगंगा नदीपात्रात नाव उलटून सहा महिलांना जलसमाधी मिळाली. मोलमजुरी करून कसेबसे आयुष्य जगणाऱ्या गावातील सहा महिलांवर एकाच दिवशी काळाने झडप घातल्याने जिल्ह्यात हळहळ व्यक्त होत आहे.

यात नाव उलटल्यानंतर खडकाचा आधार घेत बचावलेल्या सासूने डोळ्यापुढे बुडणाऱ्या सुनेला हात दिला आणि दोघीही बुडाल्या.

गडचिरोली आणि चंद्रपूर जिल्ह्याच्या सीमेवर असलेल्या गणपूर (रै) गावातील महिला मजूर चंद्रपूर जिल्ह्यातील टोक या गावी मिरची तोडण्यासाठी जातात. मंगळवारीदेखील या महिला नेहमीप्रमाणे वैनगंगा नदीपात्रातून दोन नावेने निघाल्या होत्या. परंतु आदल्या रात्री चिचडोह प्रकल्पातून कोणतीही पूर्वसूचना न देता पाण्याचा विसर्ग करण्यात आल्याने नदीपात्रात पाण्याचा प्रवाह वाढला होता. यापासून अनभिज्ञ असलेल्या नावाड्याला अंदाज न आल्याने नाव नदीच्या मधोमध गेल्यावर उलटली.

दोन नावेतील एकूण सोळा महिला बुडाल्या. यातील एक नाव ज्या ठिकाणी बुडाली त्याठिकाणी खडक जवळ असल्याने त्यातील आठ जण बचावले. परंतु दुसऱ्या नवेतील आठपैकी दोघे बचावले तर जिजाबाई दादाजी राऊत (५५), पुष्पा मुक्तेश्वर झाडे (४२), रेवंता हरिश्चंद्र झाडे (४२), मायाबाई अशोक राऊत (४५), सुषमा सचिन राऊत (२५), बुधाबाई देवाजी राऊत (६५, सर्व रा.गणपूर(रै.) या सहा महिला बुडाल्या.

यातील दोघींचे मृतदेह आढळून आले. इतरांचा शोध सुरू आहे. यात बुडालेल्या मायाबाई राऊत नाव उलटताच खडकाचा आधार घेत बचावल्या होत्या. परंतु डोळ्यापुढे सून सुषमा राऊत बुडत असताना मायाबाईने तिला वाचवण्यासाठी हात पुढे केला. पण प्रवाह अधिक असल्याने मायबाईदेखील सुनेसोबत वाहून गेल्या.

जलसमाधी मिळालेल्या महिलांमधील पाच महिला पहिल्यांदाच मजुरीसाठी निघाल्या होत्या आणि घात झाला. असे गावकऱ्यांनी सांगितले. या घटनेमुळे जिल्ह्यात हळहळ व्यक्त होत आहे.





# नया अकोला येथील जिल्हा परिषद माध्यमिक शाळेत स्नेहसंमेलन सोहळा

**दि.२४विदर्भ प्रजासत्ताक नया अकोला –** अमरावती तालुक्यातील नया अकोला येथील जिल्हा परिषद माध्यमिक शाळेत वार्षिक स्नेहसंमेलन सोहळा आयोजित करण्यात आला होता सर्व प्रथम मान्यवरांच्या हस्ते दिप प्रज्वलन करण्यात आले यानंतर मान्यवरांनी छत्रपती शिवाजी महाराज डॉ बाबासाहेब आंबेडकर भाऊसाहेब पंजाबराव देशमुख राष्ट्रसंत तुकडोजी महाराज कर्मयोगी गाडगेबाबा यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले यानंतर उपस्थित मान्यवरांचे शाल श्रीफळ पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले यानंतर उपस्थित मान्यवरांनी शाळेतील विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले विद्यार्थ्यांनी शालेय जीवनात शिक्षण घेत असताना





चांगल्या पद्धतीने शिक्षणावर लक्ष केंद्रीत केले पाहिजे आजच्या तरुण पिढीने व्यसनमुक्त भारत हि संकल्पना राबविली पाहिजे विद्यार्थ्यांनी खड.खझड.होऊन शासकीय सेवेत रुजू झाले पाहिजे आणि देशातील नागरिकांची सेवा केली पाहिजे तसेच विद्यार्थ्यांनी तरुण वयात आल्यानंतर सामाजिक उपक्रम सुध्दा राबविले पाहिजे समाजामध्ये आपल्याला चांगल्या पद्धतीने प्राणप्रतिष्ठा मिळाली पाहिजे असा नागरिक सुध्दा विद्यार्थ्यांनी होणे गरजेचे आहे सोबत आपल्या आई वडीलांची सेवा सुध्दा करण्याची गरज आहे असे मार्गदर्शन नया अकोला येथील जिल्हा परिषद माध्यमिक शाळेचे मुख्याध्यापक संजय सातपुते यांनी विद्यार्थ्यांना केले आहे सोबतच विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळावा म्हणून कबड्डी क्रिकेट फुटबॉल हॉलीबॉल खोखो लंगडी वादविवाद स्पर्धा अश्या अनेक स्पर्धा सुध्दा यावेळी घेण्यात आल्या होत्या यावेळी शिक्षक रविंद्र ढोके मच्छिंद्र अभ्यंकर सचिन वानखडे वर्षा सुकलकर सुनीता विचुंरकर बबिता भिसे योगिता डडमल रविंद्र चर्जन दामोदर घोरमाडे शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष चंदु सवाई उपाध्यक्ष अर्चना भोरे सदस्य गोपाल चवरे मोनाली धर्माळे विनोद सवाई प्रमोद गायकवाड प्रज्ञा दाभाडे सोनाली पवार सरपंच सुजाता तिडके उपसरपंच माधुरी सवाई सदस्य प्रविणा बारबुध्दे हर्षा भोरे छाया गजभिये विजय मोहोळकर आशिष घोरमाडे मयुर इंगळे प्रविण भोरे प्रामुख्याने उपस्थित होते.

# जिल्हा परिषद उर्दु माध्यमाच्या शिक्षकांची ‘पवित्र’द्वारे भरती

## पेसा क्षेंत्रात ३१३ : रिक्त जागांचे माहिती शासनाकडे सादर



बिंदू नामावली निश्चित केल्यानंतर जिल्हा परिषद शिक्षकांच्या पेक्षा क्षेत्रातील मराठी माध्यमाची ३१३ पदे रिक्त आहेत.ही पदे ज्यावेळी पेसा क्षेत्रातील स्वतंत्र पद भरती होईल त्यावेळी भरली जातील. आता मात्र उर्दु माध्यमाची जवळपास ५८ जागा रिक्त आहेत.या जागेवर आता पवित्र पोर्टलच्या माध्यमातून शिक्षकांची भरती करण्यात येणार आहे.रिक्त जागाबाबतची माहिती शासनाला सादर केलेली आहेत. लवकरच ही प्रक्रिया सुरू होईल.

**– अविश्यांत पंडा**
**मुख्यकार्यकारी अधिकारी जि.प. अमरावती**

**दि.२४ विदर्भ प्रजासत्ताक अमरावती :**

जिल्हा परिषद शाळांवरीलशिक्षकांची बिंदू नामावली निश्चित झाल्यानंतर बदली, समायोजन प्रक्रिया जवळपास आटोपली आहे. यानंतर जिल्ह्यातील मेळघाट या (पेसा) क्षेत्रात ३१३ शिक्षकांची पदे रिक्त आहेत.तर गैरआदिवासी भागात उर्दु माध्यमाची ५८ शिक्षकांच्या रिक्त जागा आहेत. या जागा भरण्यासाठी शासनस्तरावरून आता हालचाली सुरू झाल्या आहेत.

पवित्र पोर्टलच्या माध्यमातून यापैकी उर्दु माध्यमाच्या ५८ रिक्त जागा भरल्या जाणार आहेत. यासाठीचे माहिती शिक्षण विभागाने नुकतीच शासनाकडे सादर केली आहे. लवकरच प्रक्रिया सुरू होईल, असे सूत्रांकडून सांगण्यात आले. विशेष म्हणजे सध्या पेसा क्षेत्रातील पदे सध्या भरली जाणार नसली तरी ही पदेही आगामी काळात होणाऱ्या पेसा क्षेत्रात होणाऱ्या पदभरती दरम्यान भरली जाणार आहेत.

जिल्हा परिषद शाळेतील शिक्षकांच्या बिंदू नामावलीचं भिजत घोंगडं मागील अनेक वर्षांपासून कायम होते. त्यामुळे गरज असतानाही शिक्षकांच्या बदल्या करता येत नव्हत्या. याशिवाय आंतरजिल्हा बदलीनेही शिक्षकांना रिक्त जागेवर सामावून घेतांना अडचणी होत्या. नव्याने भरतीही करता येत नव्हती. त्यामुळे शिक्षण विभागाने हा प्रश्न प्राधान्याने हाती घेतला होता.

सीईओ अविश्यांत पंडा यांच्या मार्गदर्शनाखाली शिक्षणाधिकारी बुध्दभुषण सोनवने व त्याच्या चमूने बिंदू नामावलीचे काम पूर्ण करून घेतले.बिंदूनामावली निश्चित झाल्यानंतर रिक्त जागांची स्थिती समोर आली. यात जिल्हा परिषदेतील उर्दु माध्यमाच्या ५८ जागा रिक्त असलेल्या या जागा आता पवित्र पोर्टलच्या माध्यमातून भरल्या जाणार आहेत. याअनुषंगाने शिक्षण विभागाने शासनाकडे माहिती सादर केली आहे.

**'उर्दू' माध्यमाला मिळणार शिक्षक**

जिल्हा परिषदेच्या माध्यमातून उर्दू शाळाही चालविल्या जातात. या शाळांवरील शिक्षकांच्या ५८ जागा रिक्त आहेत. शिक्षकांअभावी विद्यार्थ्यांचे नुकसान होत आहे. या जागाही आता पवित्र पोर्टलच्या माध्यमातून भरल्या जाणार आहेत.

# लायसन्सची परीक्षा देताना काय काळजी घ्याल?

## नापास होणाऱ्यांचे वाढले प्रमाण; योजनेत त्रुटीही असल्याचे चित्र

**दि.२४विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

आरटीओच्या ऑनलाइन लर्निंग लायसन्सच्या परीक्षेत डमी उमेदवाराला बसवून परीक्षा देण्याचे प्रमाण वाढले होते. 'वेब कॅम' सुरू ठेवून परीक्षा देणे सुरू होताच नापास होणाऱ्यांचे प्रमाण वाढले आहे.




परीक्षा देताना इकडे-तिकडे पाहिले तरी उमेदवार अपात्र होत आहेत. यामुळे आरटीओच्या अलीकडच्या परीक्षेला काळात गंभीरतेने घेतले जात आहे; परंतु गत काही दिवसांपासून या योजनेत काही त्रुटी असल्याचे चित्र आहे.परिवहन विभागाने आधार क्रमांकाचा वापर करून 'फेसलेस' सेवेचा लाभ घेण्याची तरतूद केली आहे. त्या आधारावर घरबसल्या 'लर्निंग लायसन्स' काढणे सोपे झाले आहे.उमेदवाराला परिवहन विभागाच्या संकेतस्थळावर स्वतःचा आधार कार्ड नंबर टाकल्यावर व विचारलेल्या प्रश्नांची ६० टक्के अचूक उत्तरे - दिल्यावर लर्निंग लायसन्सची प्रिंट मिळणे अपेक्षित आहे.

**अनेकांची बनवाबनवी उघडकीस**

शिकाऊ परवाना काढण्यासाठी अनेकांनी शक्कल लढवीत दुसऱ्या उमेदवाराला परीक्षेला बसविले; परंतु पक्का परवाना काढताना अनेकांची बनवाबनवी उघडकीस येत असल्याची माहिती आहे. अशा उमेदवारांना नापास केले जाते.

# गाडगे महाराजांनी उभारलेल्या पाच घाटांपैकी दोन घाट गाळल्या गेले मातीत

## भातकुली पंचायत समितीचा भोंगळ कारभार

**दि.२४ विदर्भ प्रजासत्ताक भातकुली**

श्री संत गाडगे महाराज यांनी १९०५ साली पूर्णा नदीच्या तीरावर मुदगलेश्वर मंदिराच्या बाजूला दोन घाट तर लक्ष्मीनारायण मंदिर गाडगेबाबांची कर्मभूमी आमला या बाजूने तीन घाट उभारलेले आहेत लक्ष्मीनारायण मंदिर च्या बाजूने उभारलेले घाट सध्या पूर्णतः मातीमुक्त घाट असून शेवटी या पायरीवर पाय ठेवून पाण्यात पाय टाकता येतो तर दुसरीकडे मुद्गलेश्वर मंदिराच्या बाजूला जे दोन घाट मात्र मातीत गाळल्या गेल्यासारखे दिसत असल्याचा आरोप कोल्हापूर ग्रामपंचायत सदस्य अलकाताई निलेश पारडे यांनी केला असून निलेश पारडे यांनी स्वतः ऋणमोचन क्षेत्राला भेट देऊन पाचही त्यावेळेसचे बांधलेले घाट बघितले त्यामध्ये श्री गाडगे बाबा लक्ष्मीनारायण मंदिर ट्रस्ट च्या बाजूचे तीनही घाट मातीमुक्त



दिसून आले तर भातकुली तालुका कडून ऋणमोचन गावालगत पूर्णा नदीच्या पात्राला लागून असलेले दोन घाट एक घाट जवळजवळ पूर्णतः मातीत गेला आहे तर दुसरा मुख्य घाट च्या सात ते आठ पायऱ्या माती दबलेल्या आहेत तेव्हा प्रशासनाने युद्ध पातळीवर या घाटांची पाहणी करून त्वरित घाट मातीमुक्त करावे अशी मागणी खोलापूर ग्रामपंचायत सदस्य सौ अलकाताई निलेश पारडे यांनी केली आहे.

# न्यु हायस्कुल मेनचा शताब्दी समारोहनिमित्त वर्षभर राबविणार विविध उपक्रम

**दि.२४विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

नूतन विदर्भ शिक्षण मंडळ द्वारा संचालित न्यू हायस्कूल मेन या अमरावती शहरातील स्वातंत्र्यपूर्व काळामध्ये सुरु झालेल्या शाळेला या वर्षी १०० वर्षे पूर्ण झाली आहेत.या निमित्याने विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.



थोर स्वातंत्र्य सेनानी कै. दादासाहेब खापर्डे यांनी न्यू हायस्कूल मेन या शाळेची स्थापना राष्ट्रीय विचार रुजविण्यासाठी केली होती. स्वातंत्र्य पूर्व काळापासून तो आजपावेतो न्यू हायस्कूल मेन ही शाळा अनेक थोर लोकांच्या पिढ्या घडविणारे महत्वाचे शैक्षणिक केंद्र म्हणून नावारूपाला आलेले आहे. शाळेचे माजी मुख्याध्यापक श्री. एन. एल. इनामदार, श्री एस. जी. खांडेकर, श्री. आर. एल. खरे, श्री. एस. एन. देशपांडे, श्री. डी. एस. फडके, श्री. आर. जी. झाडगांवकर, श्री. पी. एच. देवधर, श्री. जी. जी. दवंडे, श्री. व्ही. आर. सुदामे, श्री. डी. एम. महाजन, श्री. एम. आर. झामरे, श्री. पी. एन. बोरकर तसेच अनेक माजी शिक्षकांनी राबविलेल्या प्रभावी शिक्षण प्रक्रियेमुळे न्यू हायस्कूल मेन ची ख्याती सर्वदूर पसरली होती. गेल्या १०० वर्षाच्या काळात शाळेमधून वेगवेगळ्या क्षेत्रात उल्लेखनीय योगदान दिलेल्या अनेक लोकांच्या पिढ्या अजूनही समाजात श्रेष्ठ दर्जाचे कार्य करीत आहेत. या मध्ये महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक, दादासाहेब कन्नमवार, महसूल मंत्री प्रा. पी. के. देशमुख, महाराष्ट्राचे माजी पोलीस महासंचालक श्री. सुर्यकांत जोग, मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती श्री घोडेस्वार, नाटककार व लेखक श्री. विद्याधर गोखले, श्री. मधुकर आष्टीकर, चित्रपट दिग्दर्शक शरदचंद्र सिन्हा, राजदत, झुंजार कामगार नेते व माजी खासदार सुदाम देशमुख, सुप्रसिध्द गायक भैयासाहेब देशपांडे, हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाचे प्रधान सचिव पद्मश्री श्री. प्रभाकरराव वैद्य यासारख्या अनेक गणमान्य व्यक्तींचा समावेश आहे. या जुन्या पिढीनंतरही अनेक लोक या शाळेमध्ये शिक्षण घेऊन सध्या समाजातील विविध क्षेत्रांमध्ये भरीव योगदान देत आहेत. शाळेच्या स्थापनेच्या वेळी कै. दादासाहेब खापर्डे यांनी दिलेला राष्ट्रीय विचार व समर्पित शिक्षणाची परंपरा आजही विद्यमान कार्यकारिणी, नूतन विदर्भ शिक्षण मंडळाच्या माध्यमातून सर्व शाळा व महाविद्यालयामध्ये राबविली जाते. दैदिप्यमान इतिहास असलेल्या न्यू हायस्कूल मेन या शाळेचे शताब्दी वर्ष अत्यंत थाटामाटात व उत्साहात साजरे करण्याचे संस्था तसेच शाळेने ठरविले आहे. या करिता गेल्या काही महिन्यांपासून न्यू हायस्कूल मेन शाळेमध्ये शिक्षण घेऊन गेलेल्या अनेक मार्ज विद्यार्थ्यांशी संपर्क करणे सुरु झाले. या संपर्क प्रक्रियेमध्ये जवळपास चार हजार माजी विद्यार्थ्यांशी संपर्क झाला असून या सर्वांसोबत शताब्दी महोत्सवाच्या निमिताने विविध कार्यक्रम वर्षभर राबविण्यात येणार आहेत. या शताब्दी समारोहाचा उद्घाटन समारंभ दि. २७ जानेवारी २०२४ रोजी दुपारी ०५:०० वाजता न्यू हायस्कूल मेन च्या प्रांगणामध्ये आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमाला नूतन विदर्भ शिक्षण मंडळाचे अध्यक्ष डॉ. माया शिराळकर अध्यक्ष स्थान भूषविणार आहेत. या अत्यंत हृदय कार्यक्रमाचे उद्घाटन आय.आय.टी. मुंबई चे माजी प्राध्यापक श्री. श्रीकृष्ण अनंत खापर्डे करणार आहेत. ज्या दादासाहेब खापर्डनी न्यू हायस्कूल मैन शाळेची स्थापना केली त्यांच्या नातवाच्या हस्ते शताब्दी समारोहाचे उद्घाटन होणे हा एक अपूर्व योग आहे. या भव्य कार्यक्रमाला माजी पालकमंत्री आमदार प्रविण पोटे पाटील, निवृत आय. पी. एस. अधिकारी मुकुंद उपाध्ये, फेडरेशन ऑफ इंडिअन चेम्बर्स ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीज चे अध्यक्ष श्री श्याम बंग, छत्तीसगड सरकारचे माजी महाधिवक्ता अॅड. जुगलकिशोर गिल्डा तसेच निवृत एच. आर. मॅनेजर अॅड. विनायक खापर्डे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत. या कार्यक्रमाच्या निमिताने अनेक माजी विद्यार्थ्यांचे एकत्रीकरण देखील होणार आहे. शताब्दी समारोहाच्या उद्घाटन प्रसंगी नूतन विदर्भ शिक्षण मंडळाच्या कार्यकारिणीचे सर्व सभासद देखील उपस्थित राहणार आहेत. उद्घाटन समारंभानंतर सर्व निमंत्रितांकरिता महिला महाविद्यालयाच्या संगीत विभागातर्फे 'इंद्रधनू' ही हिंदी व मराठी गौतांची सुरेल मैफील आयोजित करण्यात आली आहे.

शताब्दी समारोहाच्या उदद्घाटन समारंभाला लागुनच दिनांक २८ जानेवारी २०२४ रोजी संपूर्ण दिवस माजी विद्यार्थ्यांकरिता विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये माजी विद्यार्थ्यांचे मनोगत, सर्वांचे एकत्रित स्नेहभोजन, मंगेश ठाकरे यांचा इरसाल नमुने हा एकपात्री प्रयोग तसेच सायंकाळी 'एक शाम पुराने दोस्ती के नाम' हा सिनेगीतांचा बहारदार कार्यक्रम देखील आयोजित केलेला आहे. या सर्व कार्यक्रमांबद्दल देखील माजी विद्यार्थ्यांमध्ये भरपूर उत्साह असून मोठ्या संख्येने विद्यार्थी हजार राहणार आहेत.

न्यू हायस्कूल मेन शाळेच्या शताब्दी महोत्सवानिमित शाळेचा कायापालट करण्यासाठी व सध्याच्या विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या सर्व आधुनिक सुविधा मिळाव्यात या साठी माजी विद्यार्थ्यांनी भरपूर सहाय्य करणे सुरु केलेले आहे. यामध्ये शाळेच्या आवाहनानुसार स्मार्ट क्लासरूम, सोलर एनर्जी प्रोजेक्ट, आधुनिक संगणक प्रयोगशाळा, अत्याधुनिक विज्ञान प्रयोगशाळा, नवे फर्निचर, स्कूल व्हॅन व स्कूल बस, इत्यादी बाबींकरिता विद्यार्थ्यांच्या वेगवेगळ्या बॅचेस च्या माध्यमातून निधी गोळा केला जात आहे. शताब्दी महोत्सवाच्या वर्षात या सर्व सुविधा शाळेमध्ये निर्माण करून शिक्षण क्षेत्रात वाढत्या स्पर्धे मध्ये न्यू हायस्कूल मेन ही शाळा भौतिक सुविधांच्या बाबत व शिक्षण प्रक्रियेच्या संदर्भात अग्रणी असावी याचा प्रयत्न नूतन विदर्भ शिक्षण मंडळ या पालक संस्थेदवारे, संस्थेमध्ये काम करणाऱ्या आजी-माजी शिक्षकांद्वारे तसेच मोठ्या संख्येने असलेल्या माजी विद्यार्थ्यांद्वारे केला जात आहे. शताब्दी समारोहाच्या उद्घाटनाच्या निमिताने दिनांक २७ व २८ रोजी आयोजित होणाऱ्या सर्व कार्यक्रमांना अमरावतीकर नागरिकांनी तसेच सर्व माजी विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन नूतन विदर्भ शिक्षण मंडळाचे सचिव तसेच न्यू हायस्कूल मे चे माजी विद्यार्थी निनाद सोमण व न्यू हायस्कूल मेन च्या मुख्याध्यापिका सौ. वर्षा यादव (जदबंसी) तसेच शताब्दी समारोह समितीने केले आहे.

# तुम्ही हेडफोन, इअरफोन वापरताय का?; सावध व्हा, बहिरेपणाचा धोका वाढला

**दि.२४विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

कोणी गाणे ऐकण्यासाठी, तर कोणी फोनवर बोलण्यासाठी हेडफोन, इअरफोन वापर करतात. मात्र, हा वापर अतिप्रमाणात होत असल्याने कानाच्या पेशींना इजा पोहोचून बहिरेपणाचा धोका वाढल्याचे वैद्यकीय तपासणीतून समोर आले आहे. सन २०२० व २०२१ या दोन वर्षांत कोरोनाकाळात वर्क फ्रॉम होम आणि ऑनलाइन शाळेची संकल्पना रुजल्यानंतर अनेकांना हेडफोन, इअरफोन वापरायची सवय लागली आहे.



कोरोना हद्दपार होऊन अडीच वर्षांचा कालावधी उलटला. मात्र, हेडफोन, इअरफोन वापर कमी होण्याऐवजी वाढतच चालल्याचे दिसून येत आहे. अनेक जण तासन्तास हेडफोनचा वापर करू लागल्याने त्याचे दुष्परिणाम समोर आले आहे. दीर्घ काळ तीव्र आवाजात हेडफोन वापरल्याने कानाच्या पेशींना इजा होते. परिणामी कानात वेदना होणे, तसेच वेळप्रसंगी बहिरेपणाची शक्यताही नाकारता येत नाही, असे तज्ज्ञांनी सांगितले. विशेषतः १८ ते ३० वयोगटातील युवकवर्ग हेडफोन, इअरफोनचा अतिवापर करीत असल्याचे वैद्यकीय तपासणीतून समोर येत आहे. युवावर्ग तासन्तास हेडफोनचा वापर करीत असल्याने या वयोगटातील तरुणांना बहिरेपणाचा सर्वाधिक धोका असल्याची भीती वर्तविली जात आहे.

**रुग्णसंख्या वाढली**

कान दुखणे, पेशींना इजा पोहोचणे, कानात वेदना होणे, श्रवणक्षमता कमी होणे किंवा बहिरेपणाची शक्यता आदी तक्रारी घेऊन येणाऱ्यांची संख्या वाढत असल्याचे कान-नाक-घसा तज्ज्ञांनी सांगितले. त्यामुळे वेळीच सावध होऊन हेडफोन, इअरफोनचा अतिवापर टाळावा, असा सल्ला डॉक्टरांनी दिला.

**काळजी काय घ्यावी?**

अत्यावश्यक नसेल तर हेडफोन, इअरफोनचा वापर कटाक्षाने टाळावा.

गाणे ऐकताना किंवा फोनवर बोलताना हेडफोनचा आवाज ७० डेसिबलपेक्षा अधिक नसावा.

सर्दी असताना कदापि हेडफोन, इअरफोनचा वापर करू नये. याकडे दुर्लक्ष करणे अहितकारक ठरू शकते.

# सहा खरेदी-विक्री संघासाठी ३५४ उमेदवार रिंगणात

**दि.२४विदर्भ प्रजासत्ताक अमरावती :**

जिल्ह्यात सहा तालुका खरेदी-विक्री संस्थांच्या संचालक मंडळाची निवडणूक ११ फेब्रुवारीला होत आहे. या निवडणुकीसाठी या सर्व संस्थांसाठी ३५४ उमेदवारी अर्ज दाखल केले. ३१ जानेवारीपर्यंत अर्जाची माघार घेता येणार आहे. त्यानंतर लढतीचे चित्र स्पष्ट होईल.

अमरावती, अचलपूर, मोर्शी, वरुड, तिवसा व चांदूर रेल्वे तालुका खरेदी- विक्री संस्थेच्या पंचवार्षिक निवडणुका होत आहेत, तिवसा व चांदूर रेल्वे या संस्थेच्या प्रत्येकी १५, तर उर्वरित संस्थेच्या प्रत्येकी १७ संचालकांसाठी ही निवडणूक होत आहे. अर्ज दाखल करण्याच्या शेवटच्या दिवसापर्यंत अमरावती तालुक्यात ४६, अचलपूर ५५, वरुड ५४, तिवसा ५५ व चांदूर रेल्वेसाठी २५ उमेदवारांनी अर्ज दाखल केले. मोर्शी तालुका खरेदी-विक्री संस्थेसाठी सर्वाधिक ११९ नामांकन प्राप्त झाले. ११ फेब्रुवारीला मतदान व दुसऱ्या म्हणजेच १२ फेब्रुवारीला मतमोजणी होणार असल्याची माहिती सहकार विभागाने दिली.

# हेल्मेट सक्तीच्या अंमलबजावणीकरिता लवकरच तपासणी मोहीम : चार ठिकाणी राहणार फिक्स पॉईंट

**दि.२४विदर्भ प्रजासत्ताक धारणी :**

शहरी व ग्रामीण विभागात अपघाताचे वाढते प्रमाण लक्षात घेता प्रादेशिक परिवहन विभाग अमरावतीकडून अमरावती शहराला लागून ग्रामीण विभागात हेल्मेट सक्तीच्या अंमलबजावणीकरिता व इतर वाहन तपासणीसाठी चार ठिकाणी फिक्स पांईट येत्या दोन महिन्यात लावण्यात येणार आहे. विदर्भातून पहिल्यांदा अमरावती जिल्ह्यात याची अंमलबजावणी केली जात असल्याची माहिती प्रादेशिक परिवहन अधिकारी आर टी. गीते यांनी दिली.

हेल्मेट सक्तीची अंमलबजावणीकरिता प्रथम वलगाव येथे परतवाडा, दर्यापूर मार्गावर माहुली जहागीर येथे मोर्शी वरूड मार्ग, पोहरा येथे चांदूर रेल्वे मार्गावर तसेच नांदगाव खंडेश्वर येथे नेर परतवाडा मार्गावर असे चार ठिकाणी हेल्मेट सक्ती व इतर तपासणीकरिता नाके राहणार आहे. प्रत्येक नाक्यावर दोन अधिकारी, कर्मचारी, वाहन ड्रायव्हर इत्यादी



कर्मचारी सकाळी ९ ते संध्याकाळी ६ वाजेपर्यंत वाहनांची कडक तपासणी करणार आहे. त्यात दिवसाढवळ्या होणारी गौणखनीज तस्करीसह अवैध प्रवासी वाहतूक व हेल्मेट विना वाहतूक करणारे दुचाकीस्वार वाहनांना आळा बसणार आहे. हेल्मेट सक्तीबाबत सुरूवातीला एक आठवडा हेल्मेट घालण्यासाठी प्रसार, प्रचार, जनजागृती केल्या जाईल. एका आठवड्यानंतर हेल्मेट सक्तीची अंमलबजावणी व कार्यवाही करणार आहे. अमरावती प्रादेशिक परिवहन विभागाच्या दिमतीला पाच नवीन वाहने, दहा वाहनचालक मिळणार ही मोहीम येत्या मार्चमध्ये सुरु होण्याचे संकेत आहे.

अपघातानंतर अंकुश लावण्यासाठी हेल्मेट सक्तीची मोहीम येत्या मार्चमध्ये राबविली जाईल. जिल्ह्याच्या प्रमुख मार्गावरील चार ठिकाणी वाहन तपासणी नाके प्रादेशिक परिवहन कार्यालयाकडून लावल्या जाणार आहे. त्याकरिता परिवहन खात्याकडून निधी प्राप्त झाला आहे.

**आर. टी. गीते, प्रादेशिक परिवहन अधिकारी, अमरावती**

**वर्षभरात ४३७ अपघाती मृत्यू**

१ जानेवारी ते ३१ डिसेंबर २०२३ मध्ये एका वर्षात अमरावती शहरात ७८, ग्रामीणमध्ये ३५९ व्यक्तींचा विविध अपघातात मृत्यू झाला आहे. जिल्ह्यात एका वर्षात ४३७ मृत झाले. चाळीस टक्के मृत्यू दुचाकी अपघाताने तर साठ टक्के मृत्यू रस्त्यावर विविध कारणाने अपघात झाले आहे. वाहन तपासणी हेल्मेटसक्ती अंमलबजावणी केल्यास अपघाताचे प्रमाण कमी होण्याचे संकेत आहे.

# रेशन दुकानातून चहा, कॉफी अन् साबण केव्हा मिळणार साहेब?

## नागरिकांचा सवाल : २०२० च्या निर्णयाची अंमलबजावणी झालीच नाही

**दि.२४विदर्भ प्रजासत्ताक**
**अमरावती**

राज्य सरकारने ९ मार्च २०२० रोजी महत्वाकांक्षी निर्णय घेत स्वस्त धान्य दुकानांमधून सरकारी किमतीने धान्य विक्रीसोबतच साबण, शाम्पू, चहा पावडर, कॉफी यासह इतरही काही वस्तू विकण्यास परवानगी दिली. रेशन दुकानदारांचे उत्पन्न वाढविण्याचा उद्देश यामागे बाळगण्यात आला होता; मात्र चार वर्षे होत आली असतानाही या निर्णयाची अद्याप अंमलबजावणी करण्यत आलेली नाही.



स्वस्त धान्य दुकानांमधून गहू, तांदूळ, साखर यासह अन्य स्वरूपातील धान्य लाभार्थींना उपलब्ध करून दिले जाते. संसारोपयोगी अन्य वस्तू विकण्यास मात्र असलेली मनाई कायम आहे.

दरम्यान, धान्य विक्रीतून शासन देत असलेल्या कमिशनमधून भागत नसल्याचे कारण समोर करत इतरही काही वस्तू स्वस्त धान्य दुकानांमध्ये ठेवण्याची आणि त्याची विक्री करण्याची परवानगी देण्याची मागणी स्वस्त धान्य दुकानदार संघटनांकरन करण्यात आली होती.त्याची दखल घेत राज्य सरकारने ९ मार्च २०२० रोजी निर्णय पारित करून स्वस्त धान्यासोबतच इतर काही वस्तू विकण्यास मुभा दिली होती.

मात्र, या निर्णयाची अद्यापपर्यंत अंमलबजावणी झालेली नाही. यामुळे स्वस्त धान्य दुकानदारांमधून नाराजीचा सूर उमटत आहे.

**रेशन दुकानांकडे १५ दिवस कुणी फिरकतही नाही**

शासनाकडून धान्य उपलब्ध झाल्यानंतर जास्तीत जास्त १५ दिवसांत ते लाभार्थींना वितरित केले जाते. नंतरचे १५ दिवस मात्र या दुकानांकडे कुणी फिरकतही नाही.कडधान्य, डाळी, गूळ, शेंगदाणे, खाद्यतेल, रवा, मैदा, बेसनपीठ, भाजीपाला, स्टेशनरी वस्तू, शालेय साहित्य, दुग्धजन्य पदार्थांची विक्री करता आल्यास ही दुकाने सतत सुरू राहून रेशन दुकानदारांना उत्पन्नवाढीचा महत्वपूर्ण स्रोत उपलब्ध होणार आहे.

**रेशन दुकानांतून सध्या काय मिळते?**

जिल्ह्यातील स्वस्त धान्य दुकानांमधून रेशनकार्डधारक लाभार्थींना गहू, तांदूळ, साखरेसह विविध प्रकारच्या डाळी उपलब्ध करून दिल्या जातात.

चहा, कॉफी, साबण, हॅण्डवॉश, वॉशिंग पावडर, शाम्पू यासारख्या काही वस्तू देखील या दुकानांमधून उपलब्ध झाल्यास नागरिकांची सोय होणार आहे.

शासनस्तरावरून घेण्यात आलेल्या निर्णयाची अंमलबजावणी करण्यात यावी, अशी मागणी सर्वच स्तरांतून होत आहे.

> स्वस्त धान्य दुकानांमध्ये बाजारभावाप्रमाणेच इतरही संसारोपयोगी साहित्य मिळत असेल तर त्याचे स्वागत आहे. सरकारने हस्तक्षेप करून स्वस्त धान्याप्रमाणेच इतरही साहित्य किमान कमी किमतीत उपलब्ध करून द्यावे, इतकी अपेक्षा राहील
>
> **– संध्या पाटील (गृहणी)**
> **अमरावती**

# २६ जानेवारीला कोणते मंत्री कुठे ध्वजारोहण करणार?

**दि.२४ विदर्भ प्रजासत्ताक**
**अमरावती**

यंदा प्रजासत्ताक दिनाच्या दिवशी ध्वजारोहणाचा सोहळा राज्यभरात एकाचवेळी पार पडणार आहे. सकाळी ९ वाजून १५ मिनीटांनी हा कार्यक्रम एकाचवेळी पार पडणार आहे. या मुख्य शासकिय समारंभात निमंत्रीतांना सहभागी होता यावे या दिवशी सकाळी ८.३० ते १० वाजताच्या दरम्यान इतर कोणत्याही शआसकिय किंवा निमशासकीय समारंभ आयोजित करण्याच येऊ नये असे आवाहन परिपत्रकाद्वारे करण्यात आले आहे. याशिवाय एखाद्या संस्थेला किंवा कार्यालयाला ध्वजारोहणाचा कार्यक्म करायचा असल्यास तो सकाळी ८.३० च्या आधी किंवा १० वाजताच्यानंतर आयोजित करावा असंही नमुद करण्यात आले आहे. राज्यपाल सकाळी मुंबईतील शिवाजी पार्क, दादर येथे प्रमुख कार्यालयात उपस्थित राहून



ध्वजारोहण करतील. याशिवाय कोणते मंत्री कोठे ध्वजारोहण करतील ते आपण जाणून घेऊया.

**कोणते मंत्री कोठे ध्वजारोहण करतील?**

राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस नागपूरात ध्वजारोहण करतील, अजित पवार पुणे, राधाकृष्ण विखे पाटील अहमदनगर, सुधीर मुनगंटीवार चंद्रपूर, दिलीपराव वळसे पाटील बुलढाणा, विजय कुमार गावित भंडारा, हसन मुश्रीफ कोल्हापूर, अब्दुल सत्तार हिंगोली, चंद्रकांतदादा पाटील सोलापूर, गिरीश महाजन धुळे, सुरेश खाडे सांगली, तानाजी सावंत धाराशिव, उदय सामंत रत्नागिरी, दादाजी भूसे नाशिक, संजय राठोड यवतमाळ, गुलाबराव पाटील जळगाव, संदिपान भुमरे छत्रपती संभाजीनगर, धनंजय मुंडे बीड, रविंद्र चव्हाण सिंधुदुर्ग, अतुल सावे जालना, शंभूराज देसाई सातारा, मंगल प्रभात लोढा मुंबई उपनगर, धर्मराव बाबा आत्राम गोंदिया, संजय बनसोड लातूर, अनिल पाटील नंदूरबार, दिपक केसरकर ठाणे, आदिती तटकरे रायगड येथे ध्वजारोहण करणार आहेत.

# प्रा. अमोल करमरकर 'टॉप १० टीपीओ ऑफ द इयर - २०२३' पुरस्काराने सन्मानित

## हजारो युवकांना रोजगारक्षम करण्याचा गौरव : शैक्षणिक क्षेत्रातून अभिनंदनाचा वर्षाव

**दि.२४विदर्भ प्रजासत्ताक**
**अमरावती**

शिक्षणासोबत रोजगाराची हमी हे आजच्या शिक्षणाची ओळख. त्याकरीता विविध अभ्यासक्रमावर भर दिल्या जात आहे. मात्र, औद्योगिक क्षेत्र आणि शिक्षण यातील विकासाची कौशल्य प्रधान मनुष्यबळाची तफावत मागणी पेक्षा पुरवठा अधिक असल्याने विद्यार्थ्यांना अपेक्षीत यशापासून भरकटणारी ठरत होती. ही उणीव दूर करण्यासाठी ट्रेनिंग अँड प्लेसमेंट चा अवलंब अभियांत्रिकी व तंत्र शिक्षणामध्ये होत आहे. शिक्षण आणि औद्योगिक क्षेत्राचा योग्य समन्वय, योग्य सांगड घालत विद्यार्थ्यांना औद्योगिक क्षेत्राच्या अनुरूप प्रशिक्षणातून कौशल्य प्रधान करीत रोजगारक्षम करण्याची किमया अमरावती विभागातील तंत्र व अभियांत्रिकी शिक्षणातील सुप्रसिद्ध व्यक्तिमत्व प्रा. अमोल करमरकर यांनी साकारली आहे. आजवर ५ हजार ६०० पेक्षा अधिक विद्यार्थ्यांना प्रशिक्षीत करून त्यांना खात्रिशीर रोजगार मिळवून देणारे प्रा. अमोल करमरकर यांना नुकताच राष्ट्रीय स्तरावरील प्रतिष्ठित लिडरशीप अच्युवमेंट अंतर्गत टॉप-१० टीपीओ ऑफ द इयर - २०२३ गोल्डन एम पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे.

डायनर्जिक बिझनेस सोल्युशन प्रा. लि, द्वारे नुकताच मुंबई येथे पार पडलेल्या गौरव सोहळ्यामध्ये शिक्षक-जी.कॉम कंपनीचे संचालक विवेक त्रीवेदी यांच्या हस्ते प्रा. अमोल करमरकर यांना सन्मानित करण्यात आले. यापूर्वी करियर इनफ्ल्युन्सीयर-२०२२, बेस्ट टीपीओ महाराष्ट्र असे गौरवशाली पुरस्कार पटकवणारे प्रा. अमोल करमरकर यांना २०२३ च्या सन्मानित पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. मॅकॅनिकल इंजिनिअर, पोस्ट ग्रज्युएट, प्रोडक्शन टेक्नॉलाजी मॅनेजमेंट, एम.बी.ए मार्केटींग असे उच्च विद्या विभुषीत प्रा. अमोल करमरकर यांनी विप्रो मिशन टेन एक्स सर्टिफाईड, आयबीएम सर्टिफाइड सॉफ्टवेअर इंजिनियर व सर्वोत्कृष्ट प्रशिक्षक म्हणून राज्याच्या अभियांत्रिकी व उच्च तंत्र शिक्षण क्षेत्रात ख्याती मिळवली आहे. मागील १८ वर्षांपासून इंटरनशीप इन्क्युबेशन ट्रेनिंग अँड प्लेसमेंट




(आयआयआयटीपी) पदावर कार्यरत प्रा.अमोल करमरकर संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ सर्टिफाइड सॉफ्ट स्किल ट्रेनर असून विद्यापीठाद्वारे मान्यता प्राप्त व्होकेशनल व बी-व्होक सारख्या अभ्यासक्रमांद्वारे आयटी, सायबर सिक्युरिटी, मॅकेनिकल, इलेक्ट्रॉनिक्स, आयओटी, जीआयएस शाखेतील विद्यार्थ्यांना प्रशिक्षित करून त्यांना खात्रिशीर रोजगार मिळवून दिला आहे.

अमरावती उच्च तंत्र व अभियांत्रिकी शिक्षण क्षेत्रात गोल्डन एम अचीव्हर म्हणुन प्रसिद्ध प्रा. अमोल करकरकर यांनी श्री हनुनाम व्यायाम प्रसारक मंडळद्वारा संचालीत अभियांत्रिकी महाविद्यालय येथे मॅकॅनिकल, व्होकेशनल (आयआयआयटीपी) विभागप्रमुख, झुलेलाल इंडस्टी ऑफ टेक्नॉलॉजी नागपुर येथे ट्रेनिंग अँड प्लेसमेंट विभागाचे अधिष्ठाता आणि सध्या सुशीला सुर्यवंशी मॅनेजमेंट इंस्टीट्युट ऑफ टेक्नॉलॉजी ॲडव्हान्समेंट अमरावती येथे संचालक इंडस्ट्री रिलेशन ट्रेनिंग अँड प्लेसमेंट पदावर कार्यरत आहेत. त्यांना मिळालेल्या गौरवशाली राष्ट्रीयस्तरीय टॉप-१० टीपीओ ऑफ द इअर-२०२३ पुरस्काराबद्दल श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाचे प्रधान सचिव पद्मश्री प्रभाकरराव वैद्य, उपाध्यक्ष डॉ. श्रीकांत चेंडके, सचिव प्रा. डॉ. माधुरीताई चेंडके, झुलेलाल इंडस्टी ऑफ टेक्नॉलॉजी नागपुर चे संचालक महेश साधवानी, डॉ. माधवी वैरागडे, प्राचार्य डॉ. नरेंद्र बावने, सुशीला सुर्यवंशी मॅनेजमेंट इंस्टीट्युट ऑफ टेक्नॉलॉजी अँडव्हान्समेंट अमरावतीच्या संचालीका स्मिता सुर्यवंशी, प्रा. दिनेश सुर्यवंशी, प्राचार्य डॉ. पल्लवी मांडवगडे, डॉ. ए.पी.जे अब्दुल कलाम महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. अरूणा काकडे यांनी अभिनंदनाचा वर्षाव केला आहे.

# अयोध्येत भाऊक झाले जितेंद्रनाथ महाराज साश्रू नयनांनी केले रामलल्लाचे दर्शन



**दि.२४ विदर्भ प्रजासत्ताक**
**अंजनगाव सुर्जी**

अयोध्येत २२ जानेवारीला अभिजीत मुहूर्तावर रामलला प्राण प्रतिष्ठेचा धार्मिक विधी पूर्ण झाल्यानंतर मंदिराचे कपाट उघडण्यात आले त्या क्षणी तिथे उपस्थित असलेले श्री क्षेत्र सुरजी अंजनगाव येथील श्री देवनाथ मठाचे श्रीनाथ पिठाधिश्वर स्वामी जितेंद्रनाथ महाराज भावूक होत पाणावलेल्या डोळ्यांनी हात जोडून दर्शनाला उभे राहिले.अनेक वर्षाची तपश्चर्या पूर्ण झाल्याचा आनंद त्यांच्या चेहऱ्यावर झळकत होता रामलला प्राण प्रतिष्ठा सोहळ्यासाठी देशभरातून साधू संतांना बोलाविण्यात आले होते. त्यात अमरावती जिल्ह्यातून जितेंद्रनाथ महाराजांना निमंत्रित करण्यात आले होते.त्यापूर्वी मंदिराच्या भूमिपूजन सोहळ्यातही ते उपस्थित होते प्राण प्रतिष्ठेच्या सोहळ्यात उपस्थित राहण्यासाठी महाराजांचे १८ जानेवारी रोजी श्रीक्षेत्र सुर्जी येथून प्रस्थान झाले अयोध्येत पोहोचल्यानंतर तेथील धार्मिक कार्यक्रमातही त्यांनी सहभाग घेतला देशभरातील साधू संतांसोबत त्यांची चर्चा ही झाली.२२ जानेवारीला प्रांत प्रतिष्ठा सोहळ्यात ते विशेष निमंत्रित असून अगदी मंदिरासमोर पहिल्या रांगेत बसले होते सर्वत्र घंटानाद व श्रीरामाचा जप सुरू होता. अशातच अभिजीत मुहूर्तावर प्राणप्रतिष्ठेचा विधी पूर्ण होताच रामललाच्या प्रथम दर्शनासाठी मंदिराचे कपाट उघडल्या गेले तेव्हा महाराजांनी पाणावलेल्या डोळ्यांनी श्रीराम यांचे दोन्ही हात जोडत मनोभावे दर्शन घेतले. यावेळी हा क्षण भावविवोर करणारा होता.

# मळी देवस्थान कोळी पुरा धामोरी येथे रामायण रचियाते आद्यकवी महर्षी वाल्मिकी ऋषीं यांच्या मूर्ती प्राणप्रतिष्ठा

**दि.२४विदर्भ प्रजासत्ताक भातकुली**

तालुक्यातील धामोरी येथे दिनांक २२ जानेवारी सोमवार रोजी कोळी समाज मंदिर येथे रामायण रचीयाते आद्यकवी महर्षी वाल्मिकी ऋषीं* यांच्या मूर्तीचा प्राणप्रतिष्ठा सोहळा संपन्न झाला, २१ जानेवारी रविवार रोजी सायंकाळी रामायण रचीयाते आद्यकवी महर्षी वाल्मिकी ऋषीं यांच्या मूर्ती ची भव्य दिव्य अशी मिरवणूक काढण्यात आली मिरवणुकीला गावातील समस्त कोळी समाज बांधव, महिला



भगिनी,गावकरी तसेच भावीक भक्त उपस्थित होते.

२२ जानेवारी सकाळी श्री शुभम महाराज पांडे यांच्या मार्गदर्शनात पूजेला सुरवात झाली.नूतनकुमार वारघडे व अमोल वारघडे,सहपत्नी भाग्यश्री अमोल वारघडे.यांच्या हस्ते प्राणप्रतिष्ठा, होम हवन, सोहळा संपन्न झाला. प्रभू श्री राम अयोध्या मध्ये विराजमान होत असतांनाच धामोरी येथे आद्य कवी महर्षी वाल्मिकी यांच्या मूर्ती ची प्राणप्रतिष्ठा झाली. याचा आनंद समस्त गावकरी व पंचक्रोशीतील नागरिकांनी अनुभवला. प्राणप्रतिष्ठा आरती झाल्यावर लगेच महाप्रसादाला सुरवात झाली.

या दोन्ही दिवसाच्या कार्यक्रमासाठी गावातील तरुण पुढाकार घेवून मागील ७ दिवसापासून खूप मेहनत घेतली मंदिराला रंगरागोटि करणे मंदिर तथा मंदिर परिसर स्वच्छ करणे,या धार्मिक व सामाजिक कार्यात गावातील शेकडो युवकांनी सहभागी होवून सहकार्य दिले. या सहकार्यासाठी या युवकांचे कोळी जमातीचा वतीने सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

# केंद्रीय लिंबूवर्गीय फळ संशोधन संस्थेच्या उदासीन कारभारामुळे संत्रा उत्पादक शेतकरी संकटात

## मृग बहाराच्या संत्राला गळती ; कोट्यावधी रुपयांचे नुकसान

**दि.२४विदर्भ प्रजासत्ताक**
**मोर्शी**

संत्र्यावर संशोधन करण्यासाठी केंद्रीय लिंबूवर्गीय फळ संशोधन संस्था, तसेच डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठांतर्गत स्वतंत्र उद्यानविद्या विभाग आहे. परंतु या दोन्ही यंत्रणांकडून अमरावती जिल्ह्यातील शेतकऱ्यांना कोणत्याही प्रकारचे मार्गदर्शन होतांना दिसत नाही. मोर्शी वरूड तालुक्यातील संत्रा फळबागांचे नुकसान टाळण्यासाठी कृषी विभाग, कृषी विद्यापीठ व केंद्रीय लिंबूवर्गीय फळ संशोधन केंद्र नागपूर यांनी तातडीने संत्रा बागांची पाहणी करून संत्रावरील विवीध रोगांवर उपाय योजना करावी, शेतकऱ्यांना बांधावर जाऊन मार्गदर्शन करावे, तसेच जिल्हाधिकारी यांनी संत्रा गळतीचे सर्वेक्षण करून शेतकऱ्यांना आर्थिक मदत द्यावी यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे तालुका उपाध्यक्ष रुपेश वाळके यांनी खराब झालेला संत्रा थेट शासनाला पाठऊन शासनाच्या उदासीन धोरणाचा निषेध व्यक्त करून संत्रा धोरण ठरविण्याची मागणी केली आहे.

मोर्शी वरूड तालुक्यात भीषण दुष्काळातून अथक परिश्रम घेऊन जगवलेल्या संत्रा बागांवर बदलत्या वातावरणाने अज्ञात रोगाचे सावट आल्याचे दिसत आहे. या रोगाच्या प्रादुर्भावामुळे यावर्षी पहील्यांदाच मृग बहाराच्या संत्राला मोठ्या प्रमाणात गळती लागली असून संत्रा झाडांची पाने पिवडी पडून संत्रा झाडे वाळत चालली आहे. यावर सर्व उपाययोजना करून काही उपयोग होत नसल्याने संत्रा उत्पादक



शेतकरी हैराण झाले आहेत. यामुळे संत्राबागा वाचविण्याचे आव्हान संत्रा उत्पादक शेतकऱ्यांसमोर उभे ठाकले आहे.

मोर्शी वरुड तालुक्यात मोठ्या प्रमाणात संत्रा गळती होत असून फळांची झाडे पिवळी पडत आहे व काही झाडे सुकत आहेत. झाडावरील फळे पिवळी पडत आहे. रोग नियंत्रणात आणण्यासाठी कोणत्या उपाययोजना कराव्या यासाठी शेतकऱ्यांना मार्गदर्शन करणे गरजेचे आहे. मात्र तसे होतांना दिसत नसल्यामुळे संत्रा उत्पादक शेतकऱ्यांना कोट्यावधी रुपयांचे नुकसान सहन करावे लागत आहे. याला शासनाचे उदासीन धोरण, संशोधन, आधुनिक तंत्रज्ञान व प्रक्रिया उद्योगांचा अभाव तसेच केंद्रीय लिंबूवर्गीय फळ अनुसंधान संस्था, डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, कृषी विभाग यांचा नकारात्मक दृष्टीकोन कारणीभूत आहे.

केंद्रीय लिंबूवर्गीय फळ अनुसंधान संस्था, डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ अकोला कृषी विभाग व क्षेत्रीय स्तरावर काम करणाऱ्या अधिकाऱ्यांनी संशोधकांनी प्रत्यक्ष शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन शेतकऱ्यांच्या समस्या सोडविण्याची मागणी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे तालुका उपाध्यक्ष तथा ग्राम पंचायत सदस्य रुपेश वाळके यांनी केली असून केंद्रीय लिंबूवर्गीय फळ अनुसंधान संस्था, डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ व कृषी विभाग ८ दिवसात संत्रा उत्पादक शेतकऱ्यांच्या बांधावर न पोहचल्यास तीव्र आंदोलनाचा ईशारा दिला आहे.